बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)
चला जाऊया पूर्व विदर्भ पर्यटनाला
बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ३१ | बुधवार,दि.७ जुलै २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# ओबीसींचा डाटा केंद्राकडून मागण्यास भाजपचा विधानसभेत विरोध

**मुंबई–** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थामधील ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणासाठी राज्य मागासवर्ग आयोगाचे गठन करण्यात आले असून या आयोगास सुलभ संदर्भाकरिता आवश्यक असणारी नागरिकांच्या मागास प्रवर्गाची जातीनिहाय सर्व माहिती(इम्पेरिकल डाटा) त्वारित उपलब्ध करून द्यावा अशी केंद्राला शिफासर करणारा ठराव विधिमंडळात संमत करण्यात आला. विधानसभेत छगन भुजबळ यांनी मांडलेल्या या ठरावावरून सत्ताधारी आणि विरोधकांमधील आरोप– प्रत्यारोपाने गोंधळ झाल्याने सभागृहाचे कामकाज वांरवार स्थगित झाले.

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ओबीसी आरक्षणाच्या मुद्दयावरून विधानसभेत रणकंदन झाले. तालिका अध्यक्ष भास्कर जाधव यांना शिवीगाळ तसेच धक्काबुक्की केल्याप्रकरणी माजी मंत्री गिरीश महाजन, ॲड. आशिष शेलार, जयकुमार रावल, संजय कुटे यांच्यासह भाजपच्या १२ आमदारांना वर्षभरासाठी निलंबित करण्यात आले. विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सोमवारी अन्न व नागरी पुरवठा




मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी आरक्षणाशी संबंधित एक ठराव मांडला. केंद्र सरकारकडून इम्पिरिकल डाटा मिळवण्यासंबंधी हा ठराव होता. त्यास भाजपच्या सदस्यांनी जोरदार विरोध केला.त्यावेळी काही सदस्यांनी सभागृहात गोंधळ घातला.यावरुन भाजपची ओबीसी आरक्षणाबद्दलची दुट्टपी भूमिका जनतेसमोर उघड झाली.

तालिका अध्यक्षांसमोरचा माइक व राजदंड पळवण्याचा प्रयत्न झाला. सभागृह तहकूब झाल्यानंतरही हे सदस्य शांत झाले नाहीत. त्यांनी दालनातही गोंधळ घातला. अध्यक्षांना शिवीगाळ केली. स्वत: तालिका अध्यक्षांनी ही माहिती देत तीव्र नाराजी व्यक्त केली. भाजप सदस्यांच्या या गैरवर्तनाची गंभीर दखल घेत सत्ताधारी पक्षाने निलंबनाचा ठराव आणला. संसदीय कामकाज मंत्री ॲड. अनिल परब यांनी हा ठराव मांडला. हा ठराव आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला. दरम्यान, या कारवाई विरोधात भाजपच्या वतीने मंगळवारी राज्यभरात महाविकास आघाडीच्या विरोधात आंदोलन करण्यात आले.तर विधानभवनाच्या प्रांगणातच प्रतिरुप विधानसभेचे कामकाज करुन विरोधकांनी आंदोलन केले.

### लोकशाहीचा खून : फडणवीस

भाजपच्या सदस्यांच्या निलंबनाचा ठराव म्हणजे विरोधकांचे संख्याबळ जाणीवपूर्वक कमी करण्याचा डाव आहे. हा लोकशाहीचा खून आहे. काही सदस्यांनी गैरवर्तन केले असेल तर अध्यक्षांनी चर्चा करायला हवी. थेट निलंबन योग्य नाही, असे विरोधी पक्षनेते फडणवीस म्हणाले.

### निलंबित आमदार

संजय कुटे, आशिष शेलार, अभिमन्यू पवार, गिरीश महाजन, अतुल भातखळकर, पराग अळवणी, हरीश पिंपळी, राम सातपुते, जयकुमार रावल, योगेश सागर, नारायण कुचे, कीर्तिकुमार (बंटी) भांगडिया.

### सत्ताधाऱ्यांचा चक्रव्यूह, विरोधक आयते फसले

ओबीसी आरक्षणाच्या ठरावावर विरोधक आक्रमक होणार याची सत्ताधाऱ्यांना कल्पना होती. त्यामुळे सकाळच्या सत्रात ओबीसी आरक्षणाचा ठराव आणला गेला. तालिका अध्यक्षपदी आक्रमक भास्कर जाधवांना बसवले. सत्ताधाऱ्यांच्या या चक्रव्यूहात विरोधक फसत गेले आणि अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी तब्बल १२ सदस्यांचे निलंबन ओढवून बसले.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी प्रारंभ झाला. कार्यक्रम पत्रिकेत ८ व्या क्रमांकावर इतर मागासवगीयांचे (ओबीसी) राजकीय आरक्षण पूर्ववत करण्यासाठी केंद्र सरकारने मागास प्रवर्ग जातीची माहिती (इम्पिरिकल डाटा) द्यावा असा प्रस्ताव होता. तो ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ मांडणार होते. या ठरावावर गोंधळ होणार याची सत्ताधाऱ्यांना कल्पना होती. म्हणून तो ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मांडला. मांडण्यापूवी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी हरकत घेतली. ती फेटाळली, पण त्यावर बोलू दिले. भुजबळ यांनी ठरावात केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले. त्यानंतर फडणवीसांना बोलण्याची संधी नाकारली आणि गोंधळास प्रारंभ झाला.ठराव मंजूर करताना सत्ताधाऱ्यांनी ठरवून एकमताने न करता तो आवाजी मताने मंजूर केला. त्यामुळे विरोधकांचा या ठरावाला विरोध असल्याचे रेकॉर्डवर आले. विरोधक त्याने आणखी संतापले. अन् अध्यक्षांचा माइक खेचला गेला. यात ४ वेळा सभागृह तहकूब झाली. संतप्त भाजप आमदार अध्यक्षांच्या दालनात गेले. जाधवांना शिवीगाळ झाली, धक्काबुक्की झाली.

## साहेब जिंकलात!जिल्हाधिकारी यांच्या कार्याला सलाम

सुरेश भदाडे

**गोंदिया,–** "...तुझी सून गेली...तुझा लेक गेला : तू स्वतः ला पोरकं समजू नकोसः तुझा दुसरा मुलगा कलेक्टर आहे..." या पत्रातील ओळी आहेत गोंदियाच्या प्रशासनातील एका अतिसंवेदनशील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या. पत्रातील मजकूर कळताच त्या ८० वर्षाच्या म्हातारीच्या डोळ्यात केवळ पाणीच तरारले नाही, तर तिला तिच्या दोन चिमुकल्या नातवंडासह जगण्याला बळ देखील मिळाला. परिणामी, साहेब आपण खरचं जिंकलात! असे शब्द गोंदियाकरांच्या आज ओठावर नाचत आहेत.

दीन–दुबळ्यांचा कैवार घेणारा आणि आकस्मित संकटात सापडलेल्याना धीर देत त्यांच्या जगण्यात बळ देण्याचे कार्य कशा पद्धतीने केले जाऊ शकते, याचे उत्तम उदाहरण दिले ते गोंदियाचे धडाडीचे जिल्हाधिकारी राजेश खवले साहेबांनी. कोरोनासारख्या महामारीच्या काळात अनेक कुटुंब उद्वस्त झाली. अनेकांचा तर जगण्याचा आधारच गेला. अशा परिस्थितीमध्ये आपादग्रस्त कुटुंबीयांनी करायचे तरी काय? असा प्रश्न समाजापुढे असताना समाज बंधिलकीची जाणीव असणारा अधिकारी म्हणून गोंदियाचे जिल्हाधिकारी राजेश खवले समोर आले. आज केवळ गोंदिया जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात जिल्हाधिकारी कसा असायला पाहिजे याचे उत्तम उदाहरण म्हणून गोंदियाचे जिल्हाधिकारी यांचे नाव आपसुकच समोर येते.

नैसर्गिक आपदेने गळून पडलेल्या अनेकांना जिल्हाधिकारी महोदयांनी मदतीचा हात दिला. एवढेच नाही तर अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांना साद घालून अशा आपादग्रस्तांची मदत करून त्यांच्या जगण्याचा मार्ग सुकर केला. अनेक भगिनींना मदत करीत साडी–चोळी,धान्य पुरवून त्यांचे ते "भाऊराया' बनले. वृद्ध महिलांचे ते "पुत्र' बनले. त्यांच्या कर्तबगारी मुळे त्यांचे नाव आज गोंदियाकरांच्या तोंडी आहे.

कोविडसारख्या संकटात अनेकांचे कुंकू पुसले गेले. अनेक



चुमुकल्यांपासून जन्मदात्यांचे छत्र हिरावले गेले, अनेक म्हाताऱ्या आई पासून त्यांची वृद्धापकाळाची काठी हिरावल्या गेली. माध्यमातून अशा आशयांच्या बातम्यावाचून जवळपास सर्वांचेचे डोळे पाणावले होते. अशा वेळेस गोंदियाचे जिल्हाधिकारी खुद्द संकटग्रस्त कुटुंबीयांचे आप्तस्वकीय झाले. त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे अनेक अधिकारी, सामाजिक संघटना समोर आल्या. यातून एक सुंदर आदर्श समाजापुढे ठेवला गेला.

कोविड असो की कोणतीही आपत्ती असो, सर्व बाधितांना स्वतः जातीने लक्ष पुरवून सर्व शासकीय योजना अशा लोकांच्या दारात पोचविण्याचे मोलाचे कार्य श्री खवले साहेबांनी केले. त्यांचाच आदर्श घेत त्यांचे सहकारी अधिकारी सुद्धा मागे राहिले नाहीत. म्हणूनच म्हटले गेले आहे की, "सेनापती जर उत्तम असेल तर त्याचे सैन्य सुद्धा तितकेच उत्तम असते." गोरेगाव तालुक्यातील दोन चिमुकल्यांचे जन्मदाते गेल्याने त्यांची जबाबदारी ८० वर्षे वृद्ध आजीवर आल्याचे कळताच तिला आई म्हणून हाक मारीत रडू नको तुझा दुसरा मुलगा कलेक्टर आहे, असा धीर देणे काही सामान्य घटना नाही. एवढेच नाही तर त्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी उचलणे, हा सामाजिक बांधिलकीचा उत्तम नमूना आहे.

मुंडीपार येथे सर्पदंशाने संकट ओढवलेल्या कुटुंबाला दरमहा अर्थिक तरतूद करून मदतीचा हात देण्यासारखे अनेक कार्य गोंदिया जिल्ह्यातील इतरही तालुक्यात झाले. श्री खवले साहेब यांच्या या जाणिवेतून अनेक संघटनांनी सुद्धा अशा बाधित कुटुंबीयांना मदतीचा हात देत त्यांचे जगणे सुसह्य करण्यास हातभार लावला

जिल्हाधिकारी राजेश खवले यांच्या रुपाने कोविड सारख्या संकट काळात अनेकाना आपला भाऊ, मुलगा मिळाल्याने त्यांच्या जगण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. त्यांच्या कार्याला सलाम!

# ग्रा.पं.सदस्यांचे सामूहिक राजीनामे

## ■ गडेगाव येथील प्रकार ■ सरपंचाच्या कारभाराला कंटाळून निर्णय

**देवरी:** तालुक्यातील गडेगाव येथील सरपंच आपल्या सहकारी उपसरपंचासह ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी कारभार करुन एकतर्फी निर्णय घेत असल्याचा आरोप करीत येथील ७ ग्रामपंचायत सदस्यांनी आपले सामूहिक राजीनामे दिले. हे सर्व राजीनामे मंजूर करण्यात आले असून या सदस्यांनी ग्रामपंचायत बरखास्त करुन प्रशासक नेमावा, अशी मागणी केली आहे.

सरपंच कविता भिमराव वालदे या उपसरपंचासह ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी कारभार करीत असल्याचा आरोप गेल्या काही महिन्यांपासून होत आहे. तर तशी धुसपूसही येथील सदस्यांमध्ये होती. शासनाच्या विविध योजनाअंतर्गत गावात होत असणारी कामे सदस्यांना विश्वासात न घेता होत असल्याचा आरोप या सदस्यांकडून होत होता. ग्रामपंचायत सदस्य हतबल झाले होते. अखेर नऊ सदस्यसंख्या असलेल्या या ग्रामपंचायतीच्या सात सदस्यांनी सामूहिक राजीनामे देण्याचे ठरविले. त्यानुसार ग्रामपंचायतची विशेष सभा १ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती. सरपंच कविता भिमराव वालदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उपसरपंच लिलाराम चैतराम मडावी,




विशेष सभा आयोजित करण्यात आली असता सदस्यांनी स्वेच्छेने राजिनामे दिल्यामुळे सदर राजिनामे मंजूर करण्यात आले आहे.

**कविता भिमराव वालदे**
**सरपंच ग्रामपंचायत गडेगाव**

सरपंचाकडून कुणालाही विश्वासात न घेता मनमानी कारभार करण्यात येत होते. तेव्हा सरपंचाच्या या कारभाराला कंटाळून सातही सदस्यांनी राजिनामा दिला आहे.

**हंसराज चंदनमलगार**
**ग्रामपंचायत सदस्य तथा माजी सरपंच**

ग्राम पंचायत सदस्य हंसराज भोलाराम चंदमलागर, श्रीराम रामसु कुंभरे, ईश्वरदास भगवानसिंग अरकरा, शशिकला शैलेस कुंभरे, सारिका महेंद्र पडोटी, चंद्रकला रामकृष्ण पडोटी या सदस्यांनी आपले सामूहिक राजीनामे सरपंचाकडे सादर केले. हे सर्व राजीनामे या बैठकीत मंजूर करण्यात आले आहेत.श

दरम्यान, नऊ सदस्यांपैकी सात सदस्यांनी राजीनामे दिल्याने सदस्यसंख्या निम्म्याहून कमी झाली आहे. त्यामुळे ही ग्रामपंचायत बरखास्त करुन या ठिकाणी प्रशासक नेमावा, अशी मागणी या राजीनामा दिलेल्या सदस्यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे. त्यातच सरपंच कविता वालदे या थेट जनतेतून निवडून आल्यामुळे तिथे प्रशासक बसवून कारभार चालविला जातो कि सरपंच कायम राहणार याकडे गाडेगाववासियांचे लक्ष लागले आहे.

# एनएनटीआर व्याघ्रप्रकल्पाच्या नवेगावमध्ये आढळला "ब्लॅक लेपर्ड"

**गोंदिया:** गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नवेगाव अभयारण्यात दुर्मिळ "ब्लॅक लेपर्ड' (काळा बिबट) आढळल्याने वनप्रेमीमध्ये उत्साह संचारला आहे. ही दूर्मिळ बिबट्याची जोडी अभयारण्यातील ट्रॅप कॅमेऱ्यात वार्षीक प्राणी गणनेदरम्यानटिपली गेली असून हे छायाचित्र मार्च– मे महिन्यातील असल्याचे प्राथमिक माहितीवरून स्पष्ट होत आहे. याबाबत अजूनपर्यत डब्ल्यूआयआयने पूर्णतः खुलासा केलेला नाही.मात्र सोशल मिडीयावरील व्हायरल होत असलेल्या फोटोबाबत नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे मुख्य वनसरंक्षक व क्षेत्रसंचालक एम.राजानुजन यांनी नवेगाव परिसरातील फोटो असल्याचे म्हटले आहे.

दूर्मिळ असलेला ब्लॅक लेपर्ड दिसल्याने ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि पेंच व्याघ्र प्रकल्पातील काळ्या बिबट्या



आढळल्याची नोंद आहे. भारतीय वन्यजीव संस्थेतील वैज्ञानिक डॉं बिलाल हबीब यांनी ट्विटर हॅंडलवर बिबट्याच्या जोडीचे छायाचित्र शेअर केल्याचे सोशल मिडियातूनच कळल्याचे रामानुजन यानी म्हटले आहे.. यात भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील नागझिरा–नवेगाव टायगर रिझर्व्ह लॅंडस्केपचा उल्लेख केला आहे. पण या जोडप्याच्या ठिकाणी असलेल्या अभयारण्याची अचूक माहिती देण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे अधिवास नष्ट होणे आणि शिकार केल्यामुळे भारतीय बिबट्या एक असुरक्षित प्रजाती म्हणून सूचीबद्ध आहेत. त्यात या बिबट जोडीचे दिसणे एक आश्चर्याची बाब समजली जात आहे.

**ट्रॅप कॅमेऱ्याने टिपले दृश्य**

नागझिरा–नवेगाव टायगर रिझर्व्ह क्षेत्रात ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरा लावण्यात आले आहेत. या अभयारण्याचे क्षेत्र ६५० चौरस किलोमीटर आहे. ब्लॅक लेपर्ड हा आपल्या सोबत्यासह नागझिरा–नवेगाव टायगर रिझर्व्ह (एनएनटीआर) अभयारण्यातील ट्रॅप कॅमेऱ्यात टिपला गेला. या कॅमेऱ्यात झालेल्या नोंदी डब्ल्यूआयआयकडे व भारतीय वन्यजीव संस्थेकडे पाठविल्या जातात. याबाबत वनविभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनीही दुजोरा दिला आहे. भारतीय वन्यजीव संस्थेतील वैज्ञानिक बिलाल हबीब यांनी ट्विटर हॅंडलवर बिबट्याच्या जोडीचे छायाचित्र शेअर केल्यानंतर ही बाब उघडकीस आली.

**बिबट्यांची जोडी कॅमेरा ट्रॅप पिक्चर कॉर्टिंगमध्ये दिसून येत असून ती नवेगाव अभयारण्यातील आहे.यासंदर्भात सोशल मिडीयावर व्हायरल झालेल्या फोटोनंतर हे समोर आले असून एनएनटीआर फील्ड स्टाफकडून कॅमेरा ट्रॅपचा वापर राबविला जात आहे. ङ्खडेटाफ विश्लेषणासाठी डब्ल्यूआयआयकडे पाठविला गेला आहे. अधिक माहिती लवकरच जाहीर केली जाईल,**

**- मणिकंद रामानुजम,**
**मुख्य वनसंरक्षक तथा फील्ड डायरेक्टर, नागझिरा–नवेगाव टायगर रिझर्व्ह प्रकल्प.**

### गोंदिया जिल्हा कोरोनामुक्तीच्या वाटेवर

**गोंदिया :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून ६ जुलै रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवे १ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले.४ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांना सुट्टी देण्यात आली.आजपर्यत ४१,१५४ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. ४०,४१८ रुग्णांनी आतापर्यत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या ३५ आहे.आतापर्यत जिल्ह्यातील ५७५ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९८.२० टक्के आहे.

# प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांना खासगीचा सल्ला

**गोंदिया:** कोरोना विषाणूच्या पार्श्वभुमीवर आरोग्य यंत्रणा संसर्ग टाळण्याच्या कामाला लागली आहे. त्यातच शासकीय रुग्णालयात रुग्णांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. रुग्णालयाचे बेड कोविडसाठी राखीव असल्याचे सांगून बाई गंगाबाई रुग्णालयात प्रसुतीसाठी येणाऱ्या गोरगरीब महिलांना येथील डॉक्टर खासगी रुग्णालयात जाण्याचा सल्ला देत आहेत. या प्रकारामुळे प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांची परवड होत आहे. शिवाय रुग्णांसोबत आलेल्या नातेवाईकांना येथील कर्मचारी रात्रीच्यावेळी भर पावसात त्यांना बाहेर हाकलत असल्याचे रुग्णांचे नातेवाईकांनी सांगितले.

जिल्ह्यातील एकमेव महिला रुग्णालय असलेल्या बाई गंगाबाई महिला रुग्णालयात जिल्हाभरातून आणि लगतच्या राज्यातील महिला रुग्ण आणि प्रसुतीसाठी महिलांना दाखल केले जाते. गोरगरीब आणि ग्रामीण भागातील रुग्णांना आरोग्याच्या सोयी सुविधा मिळाव्यात, त्यांना आर्थिक भुर्दंड बसू नये यासाठी शासनाने बाई गंगाबाई महिला रुग्णालयात त्यांच्यासाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या आहे. यासाठी शासनाने लाखो रुपयांचा खर्च करीत आहेत. मात्र ज्यांच्यासाठी हा खर्च केला जातो त्यांनाच आरोग्य विषयक सुविधा मिळण्यापासून वंचित राहावे लागत आहे. बीजीडब्ल्यू रुग्णालयजात १२० बेडची क्षमता आहे. मात्र सध्या कोरोना विषाणूचा संसर्ग आटोक्यात आणण्यासाठी शासकीय रुग्णालयांमध्ये बेड आरक्षीत ठेवण्याच्या सुचना आहे. यामुळे प्रसुतीसाठी आलेल्या महिलांना येथील कार्यरत डॉक्टरांकडून परत पाठविले जात आहे. तर अनेक कर्मचाऱ्यांकडून प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांच्या नातेवाईकांना खासगी रुग्णालयात जाण्यचा सल्ला दिला जात आहे.




### गरीब कुटुंबाची गैरसोय

**महिला रुग्णांसोबत येणाऱ्या नातेवाईकांना येथील कर्मचाऱ्यांकडून रात्रीच्यावेळी त्यांना येथे थांबू नये, म्हणून भर पावसाळ्यात त्यांना हाकलण्याचाही प्रकार येथे घडत असल्याचे अनेकांनी सांगितले. त्यामुळे गरीब कुटुंबाची चांगलीच गैरसोय होत आहे. या प्रकाराकडे आरोग्य प्रशासनाने दखल घेत महिला रुग्णांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी मागणी रुग्णांच्या नातेवाईकांनी केली आहे.**

# महाज्योतीचा भोंगळ कारभार थांबेना

## जाहिरातींवरच खर्च केले तब्बल ५० लाख, गोंदियाचे सीईओ व्यवस्थाकीय संचालक

महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —

**गोंदिया:** ओबीसींच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ओबीसींसाठी महाज्योतीची स्थापना केली. परंतु या महाज्योतीला सुरुवातीपासूनच गोंदिया येथील मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप डांगे यांना अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालकांचा कार्यभार देऊन मंत्री आणि महाज्योतीचे अध्यष यांनी थट्टाच केली आहे. त्यामुळे महाज्योतीला अकार्यक्षम व्यवस्थापकीय संचालकांचे ग्रहण लागले आहे. तर जाहिरातीवरच तब्बल ५० लाख रुपये खर्च करण्यात आले असून आता जाहिराती प्रेझेंटेशनच्या भाड्यावर दोन कोटींची उधळपट्टी करणार आहेत.

अत्यंत परिश्रमाने अनेक ओबीसी संघटनांच्या मागणीमुळे ओबीसींच्या अशा आकांक्षाला शैक्षणिक आणि कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ओबीसींसाठी महाज्योतीची स्थापना ८ ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आली. परंतु या महाज्योतीला सुरुवातीपासूनच गोंदिया येथील मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप डांगे यांना अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालकांचा कार्यभार देऊन मंत्री आणि महाज्योतीचे अध्यक्ष यांनी ओबीसीबाबतच्या बेफिकीरीचे उदाहरण दिले. त्यातच या ओबीसी विरोधी धोरणामुळे सातत्याने महाज्योतीमध्ये कार्यालयीन वेळात महिनोगणती न येणे, महाज्योतीचा कारभार कंत्राटी व ओबीसी विरोधी विशीष्ठ प्रवृत्तीच्या अधिकाऱ्याकडे देऊन खऱ्या अर्थाने महाज्योतीला दुराव्यवस्थेचे आणि उधळपट्टीचे ग्रहणच लावले आहे.

सर्व स्तरातून महाज्योतीमध्ये अपयशी ठरलेले अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक यांना कार्यमुक्त करुन तेथे पूर्ण वेळ नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्रातील विविध ओबीसी संघटनांनी, महाज्योतीच्याच संचालकांनी मुख्यमंत्री व ओबीसी मंत्री यांना दिलेल्या लेखी निवेदनातून केली आहे. एवढेच नाही तर महाज्योतीच्या संचालकांनी संचालक मंडळात ही मागणी करुनही मात्र केवळ महाज्योतीचे अध्यक्ष व मंत्री यांच्या आशिर्वादाने अजूनही कार्यरत आहेत. महाज्योतीने फक्त जाहिरातीवरच आजपर्यंत सुमारे ५० लाख रुपये खर्च केले.

जाहिरातीत ा त्रुटी असल्यामुळे नव्या जाहिराती काढाव्या लागतात. महाज्योतीचा ओबीसींचा विकासाचा पैसा अशा चुकीच्या जाहिरातीवर उधळला जात असून संचालक गप्प

### मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून जाहिरात

आता महाज्योतीच्या योजनांची महाराष्ट्रभर जाहिरात करण्यासाठी प्रेझेंटेशन व्हॅन महाराष्ट्रभर फिरवून व गावांगावात लोकांची गर्दी जमवून टीव्ही स्क्रीनच्या माध्यमातून जाहिरात करायची असा ठरावच संचालक मंडळात घेतला होता. खर म्हणजे या कोरोनाच्या काळात अशी जाहिरातीसाठी गर्दी जमविणेच चुकीचे आहे. त्यातच आता मोबाईलच्या टीव्हीच्या डिजीटल जमान्यात जाहिरात पाहण्यासाठी वॅनजवळ लोक जमण्याची शक्यताच नाही.

संपादकीय

## अधिवेशन ठरले गोंधळ

महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवार व मंगळवा-ला मुंबईत पार पडले.. कोरोनाचे कारण सांगत महाविकास आघाडी सरकारने केवळ दोनच दिवसांचे अधिवेशन घेतले. राज्य विधिमंडळाच्या इतिहासातील हे कदाचित सर्वात कमी दिवसांचे अधिवेशन असावे. या दोन दिवसांत काय कामकाज होणार? जनतेच्या प्रश्नांवर चर्चा कशी होणार? सरकार जनतेचे प्रश्न कसे सोडवणार?असे असतानांच ”काल जे काही घडलं, हे कितीही कुणी काही म्हटलं तरी महाराष्ट्राच्या परंपरेला लाजिरवाणं होतं. ही आपली संस्कृती नाही, ही आपली परंपरा नाही. हल्ली जे काही चाललेलं आहे. ते बघितल्यांतर एकूण कामकाजाचा दर्जा हा उंचावण्याकडे आपला कल आहे, की खालवण्याकडे आहे? असा प्रश्न पडतो. पण मी नक्कीच म्हणेन की दर्जा खालावत चाललेला आहे.याच सभागृहात २२ मार्च २०१७ रोजी १९ आमदारांना (काँग्रेस आणि राष्ट्रवादी) गैरवर्तन केल्याबद्दल तत्तालीन भाजप सरकारच्यावतीने निलंबित करण्याचा प्रस्ताव संमत झाला होता.मात्र कालच्या व आजच्या दोन्ही गोंधळामुळे भारतीय जनता पाटी कितीही ओबीसींचा कळवळा दाखवत बसले तरीही त्यांनी केंद्राकडून जनगणनेचे आकडे मागण्यास सभागृहात केलेला विरोध म्हणजे ओबीसी जनगणनेसह आरक्षणाला एकप्रकारचा विरोधच आहे अशीही म्हणण्याची वेळ आली आहे.

राष्ट्रीय पातळीवर झालेल्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या परिषदेने मोठ्या राज्यांमध्ये वर्षभरात विधिमंडळांचे किमान शंभर दिवस कामकाज चालले पाहिजे, असा खूप वर्षांपूर्वीच ठराव केला आहे. संसदीय लोकशाही पद्धतीच्या दृष्टिकोनातून ते योग्यही आहे. राज्यात ठाकरे सरकार सत्तेवर आल्यापासून वर्षभरात किती काळ विधिमंडळाचे अधिवेशन झाले, कामकाज प्रत्यक्षात किती झाले, हे एकदा सरकारनेच जाहीर करावे. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर सुरुवातीच्या काळात अर्थसंकल्पीय अधिवेशन सात आठवडे चालत असे. पावसाळी अधिवेशन दोन ते तीन आठवडे, तर हिवाळी अधिवेशन तीन ते चार आठवडे चालविण्याचा प्रयत्न होत असे. अधिवेशनाचे कामकाज केवळ दोन दिवस ठेवणे ही तर लोकशाहीची थट्टा आहे. विशेष म्हणजे, राज्याचे मुख्यमंत्री या अल्पकालीन अधिवेशनाचे समर्थन करीत आहेत, याचे मोठे आश्चर्य वाटते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना वैधानिक कामकाजाचा अनुभव नाही, हे समजू शकते. पण त्यांच्या सरकारला आता अठरा महिने झाले आहेत. विधिमंडळ कामकाजमंत्री स्वतंत्र आहे. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनुभवी व ज्येष्ठ मंत्री सरकारमध्ये आहेत. तरीही विधिमंडळाचे अधिवेशन केवळ दोनच दिवसांत उरकले जाणार असेल, तर महाराष्ट्रावर मोठा अन्याय आहे.

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत लोकल प्रवासावर कडक निर्बंध लादले आहेत, मुंबईचे अर्थचक्र अजूनही विस्कळीत आहेत, लक्षावधी लोक अस्वस्थ व संतप्त आहेत. जनतेच्या भावना सरकारपर्यंत पोहोचत नाहीत, हेच खरे दुखणे आहे. अधिवेशन दोन दिवसांचे घेऊन सरकारने आपली जबाबदारी झटकली आहे.

राज्याला केवळ आरोग्य विषयकच नव्हे, तर राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सर्वच क्षेत्रांतील प्रश्नांनी ग्रासले आहे. अशा वेळी लोकशाहीतील राज्य पातळीवरील सवीच्च संसदीय व्यासपीठावर जनतेचे प्रश्न व भावना व्यक्त व्हाव्यात, ही जनतेची अपेक्षा असते. सरकारकडून जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी विरोधी पक्षाला पुरेशी संधी मिळाली पाहिजे. पण दोन दिवसांच्या अधिवेशनात काय साध्य होणार? गेल्या वर्षभरात सरकारने केलेले काम समाधानकारक आहे की नाही, याची साधक-बाधक चर्चा अधिवेशनात घडावी, असे अपेक्षित असते. सखोल चर्चेतून जनतेच्या हिताचे निर्णय घेतले जातात. आपण जे करतो ते सर्व बरोबरच आहे, असा सरकारचा दावा असेल, तर तो खोडून काढण्याचे काम विरोधी पक्ष अधिवेशनात करीत असतो. झालेल्या चुकांची दुरुस्ती अधिवेशनात झालेल्या चर्चेतून होत असते. पण सरकार दोन दिवसांच्या अधिवेशनातून विरोधी पक्षाला ही संधी नाकारत आहे; म्हणजेच महाराष्ट्रातील जनतेवर अन्याय करीत आहे, असेच म्हणावे लागेल.

आर्थिक अनियमितता झाली म्हणून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नातलगांच्या साखर कारखान्यावर ईडीने जप्तीची कारवाई केली. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर ईडीने हजर राहण्यासाठी तिसऱ्यांदा समन्स बजावले आहे. अजित पवार व अनिल परब यांची सीबीआयने चौकशी करावी, अशी मागणी करणारा ठराव प्रदेश भाजपने केला असून प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांनी तो केंद्राला पाठवला आहे. देशाला स्वातंर्त्य मिळाल्यापासून कोणत्याही राजकीय पक्षाने कोणा राजकीय नेत्याच्या विरोधात सीबीआय चौकशी करा, असा ठराव केलेला नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हवाला देत असले, तरी ही पाळी का आली याचे त्यांनी आत्मनिरीक्षण करावे. शिवसेनेचे तीन वेळा निवडून आलेले आमदार प्रताप सरनाईक हे गेले साडेतीन महिने अज्ञातवासात आहेत. ईडी त्यांच्या मागावर आहे. “चला, आता आपण भाजपात जाऊ या,’ असा सल्ला ते का मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना देत आहेत? यामागे काय कारण असावे? सुभाष देसाई, रवींद्र वायकर यांचीही नावे वारंवार चर्चेत येत आहेत, ती कशासाठी? मुख्यमंर्त्यानी मागील अधिवेशनात बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे याचे खुले समर्थन केले होते, “तो काय ओसामा बिन लादेन आहे का,’ असे त्यांनी मीडियासमोर म्हटले होते. मग मुख्यमंत्री अजितदादा पवार, अनिल देशमुख, प्रताप सरनाईक किंवा अनिल परब यांच्याविषयी का बोलत नाहीत? सरकारमधील मंत्र्यांवर गंभीर आरोप होत असतील किंवा ते संशयाच्या भोवऱ्यात असतील, तर मुख्यमंत्री म्हणून ठाकरे यांची भूमिका काय आहे, हे जनतेला समजणे आवश्यक आहे. विधानसभा व विधान परिषदचे सभागृह हे त्यासाठी योग्य व्यासपीठ आहे. दोन दिवसांच्या अधिवेशनात मुख्यमंत्र्यांकडून या सर्व संवेदनशील विषयांवर उत्तरे मिळणार आहेत का?

## बालकांचा तपशिल उघड करण्याबाबत बंदी

**गोंदिया :** बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ७४ नुसार कोणत्याही वृत्तपत्रात, मासिकात, वार्तापत्रात किंवा दृकश्राव्य माध्यमात किंवा अन्य कुठल्याही प्रसार माध्यमात जसे की, व्हाट्स अप, फेसबुक, इंस्टाग्राम व अन्य इत्यादी काळजी व संरक्षणाची गरज असणा?्या बालकांचे फोटो, नाव, पत्ता, शाळा किंवा इतर कोणतीही माहिती ज्यामध्ये बालकाची ओळख पटेल अशी माहिती किंवा तपशिल प्रकाशित करण्यात येऊ नये. असे केल्यास बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ७४ नुसार गुन्हा आहे.

काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची माहिती इतरत्र पसरल्यास समाजकंटक किंवा अवैद्यरित्या मुलांची तस्करी, अवैद्य दत्तक प्रक्रिया, गुप्तधनासाठी शोधात असणारे लोक, जादुटोणा सारख्या वाईट परंपरांना जपण-ारे लोक, नरबळीसाठी अशा अनाथ व काळजी व संरक्षणाची गरज असणा?्या लोकांना एक सुवर्णसंधी प्राप्त होते. सर्व प्रसार माध्यमे, दान करणारे, मदत करणारे दानदात्यांनी आपले फ ोटो बालकांसोबत काढून प्रस-ारीत करण्यात येऊ नये, याची दक्षता घ्यावी.

तसे आढळून आल्यास त्या व्यक्तीस सहा महिने पर्यंत कैद किंवा दोन लाखापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतील. अशी बालके आढळून आल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती, गोंदिया यांना ९८३४८७८५१९, ९ ७ ६ ५ २ ६ ६ ७ ५ ६ , ८००७१४८५४२ या भ्रमणध्वन-ीवर कळविण्यात यावे.

जेणेकरुन अशा बालकांची गरज लक्षात घेऊन त्यांना योग्य ती मदत तसेच त्यांचे योग्य पुनर्वसन करता येईल, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनीकर यांनी केले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# ओबीसींचे केवळ आरक्षणच नव्हे,अस्तित्वच धोक्यात आहे!

“तुम्ही मला सत्ता द्या, मी चार महिन्याच्या आत ओबीसींचे राजकीय आरक्षण परत देतो’ अशी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या थाटाची घोषणा करणाऱ्या माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यावर विश्वास कसा ठेवावा? “मुख्यमंत्री झाल्यावर चार महिन्याच्या आत मी ओबीसी आरक्षण देऊ नाही शकलो तर, राजकारण सन्यास घेईल’, ही त्यांची घोषणा तर खूपच हास्यास्पद आहे. खरं म्हणजे त्यांना राजकारण सन्यास घेण्याची नामी संधी अनेकवेळा चालून आली होती, त्यावेळी मात्र ते “मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन’ अशा घोषणा देण्यात मग्न होते. ओबीसींचं गेलेलं आरक्षण चार महिन्यात परत आणण्याचं आश्वासन देणाऱ्या फडणवीस साहेबांनी मुख्यमंत्री असतांनाही तब्बल चार वर्षांची मुदतवाढ घेऊनही ते आरक्षण परत आणू शकलेले नव्हते, ही वस्तुस्थिती असतांना त्यांच्यावर

**विश्वास कसा ठेवावा?**

मंडल आयोग चळवळीच्या पार्श्वभूमीवर ऐंशी व नव्वदीच्या दशकात ओबीसींची चळवळ देशभर आकार घेऊ लागली होती. फाळणीच्या पार्श्वभूमीवर १९४७ साली निर्माण झालेली मुस्लीम वोटबँक, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर (१९५६) निर्माण झालेली “दलित वोटबँक’ आणी आता १९८५ नंतर निर्माण झालेली “ओबीसी वोटबँक’ हा आपल्या देशाच्या लोकशाहीचा इतिहास आहे. मुस्लीम व दलित वोटबँकेने उच्चजातीय काँग्रेस पक्षाचा पाया भक्कम केला, मात्र ओबीसी वोटबँकेमुळे काँग्रेस व भाजपचाही डोलारा डगमगू ला-गला. १९९० साली ओबीसींची वोटबँक कॅश करून पुन्हा प्रधानमंत्री होण्याचे व्हि.पी. सिंगांचे स्वप्न भंगले असले तरी त्यांनी केलेल्या मंडल आयोगाच्या अंशतः अमलबजावणीमुळे ओबीसी चळवळ अधिकच गतिमान झाली. अनेक ओबीसीबहुल राज्यांमध्ये ओबीसींचे पक्ष स्थापन होऊ लागलेत व ते सत्तेवरही येऊ लागलेत. परिणामी काँग्रेस व भाजपलाही धक्का बसला. मुख्यतः काँग्रेसपक्षाचा गावपातळीवरचा पाया खचू लागला होता. तो सावरण्यासाठी १९९४ साली तत्कालीन काँग्रेसी केंद्रसरकारने त्र्याहत्तरावी व चौऱ्याहत्तरावी घटनादुरूस्ती करून आपली ओबीसी वोटबँक वाचविण्याचा प्रयत्न केला. या घटनादुरूस्तीमुळे ओबीसींच्या सोबत एस्सी व एस्टी (दलित-आदिवासी) या प्रवर्गानाही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण द्यावे लागले. १९९४ पूर्वी संविधानात कोणत्याही मागास प्रवर्गाला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण नव्हते. केवळ ओबीसींमुळे एस्सी व एस्टी प्रवर्गाला हे संवैधानिक राजकीय आरक्षण मिळायला लागले. महाराष्ट्रातील काही ओबीसी विचारवंत या घटनादुरुस्तीचे श्रेय माननीय शरद पवारांना देतात, यावरून या विचारवंतांना आमदार व्हायची किती घाई झाली आहे, याची कल्पना येते.

१९९४ सालीच या घटना-दुरूस्तीला आव्हान देणारी याचिका के. कृष्णमूर्ती यांनी सुप्रिम कोर्टात दाखल केली. “के. कृष्णमूर्ती विरूद्ध भारत सरकार’ या याचिकेचा निकाल २०१० साली आला. या निकालातील तीन महत्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे होते- १) सुप्रिम कोर्टाने ७३ वी व ७४ वी घटनादुरूस्ती वैध ठरविली. २) एस्सी+एस्टी+ओबीसी या तिन्ही प्रवर्गांचे एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या वर जायला नको. व ३) एस्सी व एस्टी यांच्यासाठी राखीव असलेले मतदारसंघ वगळता इतर मतदारसंघांचा (वार्डांचा) इंपिरीकल डेटा गोळा करावा व त्याआधारे ओबीसींचे आरक्षण निश्चित करावे.

परंतू या निकालाची गंभीर दखल त्याकाळी कोणीही घेतली नाही, याचे मुख्य कारण हे होते की, २००९ ते २०११ या काळात ओबीसी जनगणनेचे आंदोलन पेटलेले होते. संसदेत ओबीसी जनगननेच्या प्रश्नावर अनेकवेळा गदारोळ झाला होता व संसद बंदही पाडण्यात आली होती. ओबीसी खासदारांनी संसदेत व संसदेच्या बाहेर घणाघाती भाषणे करून प्रस्थापित पक्षांना जेरीस आणले होते. उच्चजातीय पक्षांचेच खासदार-आमदार असलेले ओबीसी नेते उघड-उघड प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध आक्रमकपणे बोलू लागले होते, अशा काळात सुप्रिम कोर्टाच्या या ओबीसीविरोधी निकालावर बोलण्याची हिम्मत कोण करील? त्याची अमलबजावणी करण्याची गोष्ट तर फारच लांब राहीली.

ओबीसी जनगणनेच्या प्रश्नावर आक्रमक आंदोलन करणा?्या बहुतेक सर्वच ओबीसी नेत्यांना २०१६ पर्यंत वेगवेगळ्या मार्गाने ङ्गगपगारफ करण्यात आले. ईडी, सीबीआय, मिडीया-ट्रायल, हकालपट्टी, जेल व अपघात असे सर्व वैध-अवैध मार्ग वापरून ओबीसी नेते संपविण्यात यश आल्यानंतर २०१६ साली २०१० च्या सुप्रिम कोर्टाच्या निकालाचा अमलबजावणीचा मार्ग खूला झाला.




या निकालाचा आधार घेऊनच २०१६ साली नागपूर हायकोर्टाच्या खंड पीठात ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या विरोधात याचिका दाखल झाली, तेव्हा महाराष्ट्रात माननीय देवेंद्रजी फडणवीस मुख्यम ंत्री होते. खंडपीठासमोर झालेल्या पहिल्याच सुनावणीत फडणवीस सरकारतर्फे असे सांगण्यात आले की, “याबाबतीत योग्य ती उपाययोजना सरकार करीत आहे.’ मात्र प्रत्यक्षात या दिशेने एकही पाऊल उचलण्यात आले नाही. खंडपीठाने वारंवार सुचित केल्यानंतर ९ मार्च २०१७ रोजी, २७ ऑगस्ट २०१८ व त्यानंतर पुन्हा २८ ऑक्टोबर २०१८ रोजी उपाययोजनेसाठी मुदत मागून घेतली गेली. अशा प्रकारे चार वर्षात चारवेळा मुदतवाढ मागून घेऊनही फडणवीस सरकारने कोणतीही कार्यवाही केली नाही. या उलट फडणवीस सरकारने खंडपीठाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेऊ देण्याची विनंती केली. खंडपीठाने न्यायालयाच्या निकालाधिन राहून निवडणूका घेण्याची परवानगी दिली. अशाप्रकारे कोणताही इंपिरीकल डेटा राज्य निवडणूक आयोगाला न देता तात्पुरता अध्यादेश काढून या निवडणूका घेण्यात आल्यात. निवडणूका झाल्यावरही या विषयावर फडणवीस सरकार सुस्तच राहीले.

मध्यप्रदेश हायकोर्टाने ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणाच्या आदेशाला स्थगिती दिलेली आहे. ही स्थगिती उठविण्यासाठी हायकोर्टाला ओबीसींची टक्केवारी, आकडेवारी व इतर माहीती देणे आवश्यक होते. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंग चौहाण यांनी केंद्र सरकारकडून ओबीसींची ही माहीती मागीतली व केंद्र सरकाने दिली. त्याचवेळी फडणवीसांनीही महाराष्ट्रातील ओबीसींची माहीती मागीतली, परंतू केंद्राने फडणवीसांना ही माहीती दिलीच नाही. शिवराज चव्हाण हे भाजपचे, फडणवीसही भाजपचेच व केंद्र सरकारही भाजपचेच! मग शिवराज सिंगांना मिळते, फडणवीसांना का नाही मिळत? शिवराज सिंगांनी चहा मागवला, तसा फडणवीसांनीही चहा मागवला. परंतू शिवराज सिंगांनी चहा आणण्यासाठी “आण्णाला” पाठविले व फडणवीसांनी “नानाला” सांगीतले. आण्णाची चहा येते, मात्र नानाची चहा कधीच येत नाही. शिवराजसिंग ओबीसी जातीतील असल्याने ते आण्णाला चहा आणायला सांगतात व फडणवीस हे ब्राह्मण असल्याने त्यांनी “नानाला’ चहा आणायला सांगीतले.

फडणवीस मुख्यमंत्री असतांना २०१६ ते २०१९ या चार वर्षात जे काम ते करू शकले नाहीत, ते काम आता चार महिन्यातच करून दाखविण्याचा दावा करीत आहेत. आणी त्यासाठी पुन्हा मुख्यम ंत्रीपदाची मागणी ओबीसी जनतेकडे करीत आहेत. फडणवीसांसारखे राजकारणी खोटं बोलतात पण रेटून बोलतात. मात्र आता ओबीसी जागृत झालेले असल्याने अशा खोट्या आश्वासनांवर ते विश्वास ठेवायला तयार नाहीत.

त्यानंतर २०१९ साली विधानसभेच्या निवडणूका होऊन तीन पक्षांच्या “महाराष्ट्र विकास आघाडीचे सरकार आले. या नव्या सरकारनेही हा विषय दुर्लक्षीत ठेवला. फडणवीस सरकारने ३१ जुलै २०१९ रोजी काढलेल्या तात्पुरत्या अध्यादेशाची मुदत संपेपर्यंत म.वि. आघाडी सरकारने त्यावर काही उपाययोजना करणे आवश्यक होते. मात्र काहीही कारवाई न झाल्याने ही मुदत संपली. त्यानंतर विकास गवळी नावाच्या व्यक्तीने सुप्रिम कोर्टात धाव घेतली व परिणामी पाच जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थातील ओबीसी-मतदारसंघाच्या निवडणूका रद्द झाल्यात त्यासोबतच देशभरातील ओबीसींचे राजकीय आरक्षणही धोक्यात आले. त्यानंतर उद्धव ठाकरे सरकार व विरोधी पक्षही एकाचवेळी जागे झालेत. मात्र ही जाग त्यांना एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यासाठी आलेली होती, काम करण्यासाठी नव्हे. इंपिरिकल डेटा गोळा करण्यासाठी व योग्य ते निष्कर्ष काढून ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी ताबडतोब विशेष (समर्पित) तज्ज्ञांचा आयोग नेमणे अपेक्षित होते. परंतू तसे न करता राज्य मागास आयोगालाच हे काम करायला सांगणे म्हणजे अज्ञानाची परिसीमा गाठणे होय! दरम्यान निवडणूक आयोगाने निवडणूक कायद्याच्या अधिन राहून ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणूका जाहीर केल्या आहेत.

यात तांत्रिकदृष्ट्या विरोधी पक्ष व सरकारी पक्ष दोघेही जबाबदार असले तरी महाराष्ट्रातील प्रमुख पाचही पक्षांचे नेते उच्चजातीय (मराठा-ब्राह्मण) असल्याने त्यांनी ओबीसींची काळजी वाहावी, अशी अपेक्षा करणे चूकीचे ठरेल. सामाजिकदृष्ट्या विचार केला तर ओबीसींचे राजकीय आरक्षण घालवायला ओबीसी आमदार व ओबीसी मंत्रीच जास्त जबाबदार आहेत. प्रस्थापित व्यवस्थेने लढाऊ ओबीसी नेत्यांच्या विरोधात इडी, सीबीआय, हकालपट्टी, मिडिया ट्रायल, जेल व अपघात या साधनांचा वापर मोठ्या प्रमाणात करायला सुरूवात केल्याने ओबीसी नेते ओबीसींच्या प्रश्नांवर बोलायला घाबरतात. त्या तुलनेत सत्ताधारी असलेल्या मराठा (क्षत्रिय) जा-तीचे मंत्री आपल्या मराठाजातीच्या हितासाठी कोणत्याही थराला जाण्याची हिम्मत करतात.

ओबीसींच्या महाजोतीचे १२५ कोटी रूपये परत घेऊन ते मराठ्यांच्या सारथीला देणे, मागासवर्गीय कर्मचारी-अधिकाऱ्यांचे बढतीमधील आरक्षण एका साध्या जी.आर. ने रद्द करणे, समाजकल्याण खात्याचे १०५ कोटी रूपये परत घेणे, अशी कितीतरी कामे मराठ्यांच्या हितासाठी बेकायदेशिरपणे केली जातात. मात्र ओबीसींचे संवैधानिक अधिकार शाबूत ठेवण्यासाठी ओबीसी मंत्री ना पक्षाच्या बैठकीत बोलतात, ना मंत्रीमंडळ परिषदेत ठराव मांडतात. मात्र आपले ओबीसी नेतृत्व शाबूत ठेवण्यासाठी रस्त्यावरच्या आंदोलनाची नवटंकी करतात. अर्थात अशी आंदोलने करण्यासाठीही आपल्या उच्चजातीय मालकांच्या आदेशाची वाट पाहातात. मृत्युच्या व जेलच्या दहशतीत राहून ओबीसींचे वाटोळे करण्यापेक्षा या ओबीसी नेत्यांनी ताबडतोब राजीनामे देऊन घरी बसले पाहिजे.

ओबीसी नेत्यांनी राजकीय मृत्यू स्वीकारण्याऐवजी तामिळनाडूतील ओबीसी पक्षांचा आदर्श घेतला पाहिजे. तामिळनाडूत गेल्या ५० वर्षांपासून ओबीसींचे राजकीय पक्ष सत्तेवर आहेत. या ओबीसी सत्ताधाऱ्यांनी आपल्या तामीळनाडू राज्यात दलित, आदिवासी, मुसलमान, ख्रिश्चन व मराठासम असलेल्या क्षत्रिय जातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र आरक्षण दिलेले आहे. त्यासाठी या ओबीसी राज्यकर्त्यांनी संविधानालाही जुमानलेले नाही, सुप्रिम कोर्ट व केंद्र सरकारचे अनेक आरक्षणविरोधी आदेश त्यांनी धुडकावून लावले आहेत. याला म्हणतात स्वाभिमानाचे राजकारण! हे स्वाभिमानाचे राजकारण करता यावे म्हणून तामिळनाडूच्या ओबीसी नेत्यांनी गेल्या शंभर-सव्वाशे वर्षात काय काय तपश्चर्या केली, हे सांगण्याची ही जागा नाही. त्यासाठी महाराष्ट्रातील ओबीसी नेत्यांनी माझ्याकडे विनाशूल्क शिकवणी लावावी. ओबीसींचे केवळ आरक्षणच नव्हे तर अस्तित्वच धोक्यात आलेले असतांना माझ्या शिकवणीवर्गाशिवाय दुसरा कोणताही मार्ग शिल्लक राहीलेला नाही, हे ओबीसी नेत्यांच्या लक्षात ज्या दिवशी येईल, तो दिवस सोनियाचा समजावा!

सत्य की जय हो! धन्यवाद!

(लेखक हे ४० वर्षांपासून ओबीसी चळवळीत काम करीत आहेत व त्यांनी अनेक पुस्तके या विषयावर लिहीली आहेत) लेखक

**- प्रा. श्रावण देवरे, नाशिक,**
**मोबाईल- ९४ २२७ ८८ ५४६**
B©_ob-s. deore2012@gmail.com

## धान पुरवठा धारकाला ७८ लाखाचा गंडा,पोलिसात तक्रार दाखल

**गोंदिया :** तालुक्यातील सेंट्रल कृषक सेवा सहकारी संस्था मर्यादीत गोंदिया अंतर्गत ३२ गावांची असलेल्या संस्थेत खरीप हंगाम २०१९ तसेच रब्बी हंगाम २०२० मध्ये ४.५० कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आला होता. दरम्यान हा घोटाळा दाबण्यासाठी संस्थेने सालेकसा तालुक्यातील हरीश ट्रेडर्स पहलाटोला/बाम्हणीचे संचालन लक्ष्मण नागपूरे यांच्याकडून ५२१८.८० क्विंटल धान घेवून संस्था वाचविण्यात यश मिळविले.

मात्र सेंट्रक कृषक सेवा संस्थेचा प्रताप इथेच थांबला नाही तर चक्क पुरवठा धारकाचे जवळपास ७८ लाख रुपये थकविल्याने पुरवठा धारक लक्ष्मण नागपुरे यांच्यावर प्रचंड आर्थिक व मानसिक तणाव निर्माण झाला असून न्यायासाठी नागपुरे यांनी सालेकसा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

सविस्तर असे की, गोंदिया तालुक्यातील ३२ गावांची अस-लेली सेंट्रल कृषक सेवासहकारी संस्थेच्या माध्यमातून शासकीय धान खरेदी योजनेंतर्गत धान खरेदी करण्यात येते, त्यातच संस्थेच्या वतीने खरीप हंगाम २०१९ तसेच रब्बी हंगाम २०२० मध्ये धान खरेदी करण्यात आली. परंतु संस्थेच्या वतीने या हंगामातील धानाची परस्पर अफरातफर करून जवळपास १७ हजार ७२५ क्विंटल धान किंमत ४.५० कोटी रुपयांची परस्पर विल्हेवाट लावल्याचे प्रकरण समोर आले.

दरम्यान या प्रकरणाला घेऊन डीएमओ. खर्चे यांनी २९ सप्टेंबर २०२० रोजी संस्थेला कारणे दाखवा नोटिसही बजा-वले होते. तसेच खरेदी केलेला शासकीय धानाची विल्हेवाट झाली असल्यास त्याची जबाबदारी संस्थेच्या संचालक मंडळाची असून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा व वसूलीही करण्यात यावी, या मागणीला घेवून कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनलाल ठाकरे तसेच राजकुमार गौतम, माजी जि.प. सदस्य नरेंद्र तुरकर, रामप्रसाद लिल्हारे, बसंत दसहरे, रमेश चिखलोंडे, देवचंद खिचलोंडे, राजकुमार रणगिरे, विनोद बिसेन, सुरेश डोंगरवार, संजू लिल्हारे यांनी जिल्हाधिकाऱ्यामार्फत निवेदन देऊन न्यायाची मागणी केली होती. त्यानंतर या संस्थेची मान्यता रद्द करण्यात आली. परंतु राजकीय तंत्राचा वापर करून सेंट्रक कृषक संस्थेने परत मान्यता मिळविण्यात यश मिळविले. त्यानंतर संस्थेच्या मार्फत खरेदीही सुरू झाली पण पुरवठा धारकाला पैसे देण्यास संस्थेने टाळाटाळ सुरू केल्याने पुन्हा भ्रष्टाचार होत असल्याचे दिसून येत आहे.

### संस्थेला वाचविण्यासाठी राजकीय वरदहस्त

संस्थेने आपल्याला वाचविण्यासाठी हरिश ट्रेडर्स पहलाटोला/बाम्हणीचे संचालक लक्ष्मण नागपुरे यांच्यामार्फत २५ सप्टेंबर २०२० ते २७ ऑक्टोबर २०२० या कालावधीत ५२१८.८० क्विंटल धान प्रती क्विंटल १६१० रुपये या दराने खरेदी केले. त्याची एकूण रक्कम ८४ लाख २ हजार २६८ रुपये असून त्यापैकी ७ लाख ३८ हजार रुपये यांना मिळाले तर उर्वरित ७७ लाख ६४ हजार २६८ रुपये देण्यास संस्थेचे वतीने टाळाटाळ करण्यात येत आहे. या बाबीला आता वर्ष लोटत चालला आहे.

विशेष म्हणजे सेंट्रक कृषक संस्थेत पुरवठा धारक नागपुरे यांनी केलेल्या धानाच्या पुरवठ्याचा सर्व पोचपावती त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. एकंदरीत संस्थेने पुवी केलेला ४.५ कोटीचा घोटाळ्याची श्याही अद्याप सुकली नसतांना चक्क पुरवठा धारकाच्याच जीव-ावर ही संस्था उठली असल्याने त्या पुरवठा धारकावर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. परिणामी नागपुरे यांनी आपल्याला न्याय मिळावा व गंडविलेले पैसे परत मिळावे, यासाठी सालेकसा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. विशेष म्हणजे दाखल तक्रारीनुरूप अद्यापही संस्थेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आ-लेला नाही. सेंट्रल कृषक संस्थेच्या या प्रकरणाला राजकीय वर्दहस्त असल्याने कारवाई होत नसल्याचीही चर्चा आहे. तेव्हा हे प्रकरण पुढे काय वळन घेते, याकडे लक्ष लागले आहे.

## पांगोली नदीकाठावरील स्मशानभूमीत अतिक्रमण



**गोरेगाव:** पांगोली नदीकाठी असलेल्या स्मशानभूमीच्या जागेवर दोन शेतकऱ्यांनी अतिक्रमण केले असून अतिक्रमण हटविण्यासाठी माजी सभापती लक्ष्मीकांत बार-ेवार यांनी तहसीलदार, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी यांना तक्रार केली आहे.

गोरेगाव येथील ग्यान-ीराम देशमुख यांची पांगोली नदीकाठी शेतजमीन होती. त्यांच्या मृत्यूनंतर कुटुंबियांनी ही शेती स्मशानभूमीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था गोरेगाव यांना दान दिली होती. त्यामुळे येथील नागरिक ६० वर्षांपासून अंत्यविधीसाठी या जागेचा वापर करीत आहेत. परंतु या स्मशानभूमीवर दिनेश रहांगडाले, प्रभाकर पटले यांनी अतिक्रमण करुन जेसीबीच्या सहाय्याने शेती तयार केली. त्यामुळे गोरेगावकरांना अंत्यविधीसाठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे माजी सभापती लक्ष्मीकांत बारेवार यांनी नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेऊन तहसीलदार सचिन गोसावी, मुख्याधिकारी हर्षला राणे, पोलीस निरीक्षक म्हात्रे यांना तक्रार केली. त्यांनी हे अतिक्रमण हटविण्याची मागणी केली आहे.

## इंडसच्या डोंगरगाव येथीलल मोबाइल टॉवर उभारणीला सूद चॅरीटी फाऊंडेशनसोबत सहकार्य

**■ विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण सहज उपलब्ध करून देणार ■ बहुतांश विद्यार्थ्यांसह ४५०० रहिवाशांना इंटरनेट कनेक्टिव्हीटी मिळवून देणार**

**गोंदिया:** देशभरात कम्युनिकेशन उपलब्ध करून देण्याची आपली बांधिलकी जपत इंडस टॉवर्सने सूद चॅरीटी फाऊंडेशनसोबत सहकार्य करून महाराष्ट्रातील जिल्ह्या-तील शहराजवळील डोंगरगाव/पारडीबांध येथे मोबाइल टॉवर उभारला आहे. यामुळे या भागात कनेक्टिव्हीटी अगदी सहज उप-लब्ध होईल. नागपूरपासून अवघ्या १५० किमी. अंतरावर असूनही टॉवर नसल्याने या भागात इंटरनेट कनेक्टिव्हीटी अगदीच कमी आहे. शहराजवळील नागरीकांनी सोशल मिडियावर समाजसेवकांना विनंती करत या भागातील नेटवर्क सुधारण्यात सहाय्य मागितले होते.नेटवर्कमुळे या भागातील विद्यार्थ्यांना ॅनलाइन क्लासेस करण्यास अडचण होत असल्याचे पाहणीत आढळून आल्याने आणि नागरिकांच्या मागणीमुळे पाऱडीबांद/डोंगरगावातील या नव्या टॉवरमुळे दोन गावांतील ४५०० हून अधिक लोकांना फायदा होणार आहे. या गावातील ६० टक्के ग्रामस्थ शेतकरी आहेत आणि ऑनलाइन शिक्षणावर अवलंबून असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही प्रचंड आहे.

उभारणीचे काम पूर्ण झाल्याबद्दल सोनू सूद फाऊंडेशनचे संस्थापक आणि समाजसेवक सोनू सूद म्हणाले, “ऑनलाइन शिक्षण ही नवी पद्धत रूढ झाली आहे. मात्र, इंटरनेट नसल्याने या विद्यार्थ्यांना हे शक्य होत नाही हे माझ्या लक्षात आणून दिल्यानंतर माझे मित्र करण गिलहोत्रा यांच्यासोबत मी इंडस टॉवर्सला भेटून यावर काय उपाय करता येईल, हे पाहिले. महिन्याभराच्या आत इथे नवा टॉवर उभा राहिला आणि इंटरनेट नसणं ही बाब भूतकाळ ठरली. आता इथल्या शेकडो मुलांना त्यांच्या ऑनलाइन शिक्षणासाठी अविरत कनेक्टिव्हिटी उपलब्ध आहे.

indus TOWERS
Putting India First

इंडस टॉवर्सचे महाराष्ट्र आणि गोव्याचे सीसीईओ दिनेश अर-ोरा म्हणाले, मोबाइल टॉवर्स हा टेलिकॉम क्षेत्रातील फार महत्त्वाचा भाग आहे आणि भारतातील दुर्गम भागातही उत्कृष्ट शैक्षणिक अनुभव देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. डोंगरगाव येथे मोबाइल टॉवर उभारून ग्रामस्थांसाठी नेटवर्क कव्हरेज सुधारण्यासाठी सूद चॅररटी फाऊंडेशनसोबत सहकार्य करताना इंडस टॉवर्सला अभिमान वाटतोय. येथील स्थानिक समुदायाचे प्रयत्न आणि सूद चॅरीटी फाऊंडेशनचा मानवतावादी सहभाग यामुळेच या नव्या टॉवरची यंत्रणा सुरू करणे शक्य झाले. या नव्या टॉवरमुळे या भागातील नेटवर्क सुधारेल. त्यामुळे विद्यार्थ्यानात्यांच्या घरा-तील सुरक्षित वातावरणातून सहज ऑनलाइन क्लासेस करता येतील आणि ग्रामस्थांनाही सहजसोपी मोबाइल कनेक्टिव्हि मिळेल. यापुढेही, देशभरात कम्युनिकेशन उपलब्ध करून देण्याच्या आमच्या उद्दीष्टानुसार आम्ही सातत्याने दमदार आणि परिणामकारक टेलिकॉम सुविधा उभारत राहू.”

उभारणीचे काम पूर्ण झाल्याबद्दल सोनू सूद फाऊंडेशनचे संस्थापक आणि समाजसेवक सोनू सूद म्हणाले, ऑनलाइन शिक्षण ही नवी पद्धत रूढ झाली आहे. मात्र, इंटरनेट नसल्याने या विद्यार्थयांना हे शक्य होत नाही हे माझ्या लक्षात आणून दिल्यानंतर माझे मित्र करण गिलहोत्रा यांच्यासोबत मी इंडस टॉवर्सला भेटून यावर काय उपाय करता येईल, हे पाहिले. महिन्याभराच्या आत इथे नवा टॉवर उभा राहिला आणि इंटरनेट नसणं ही बाब भूतकाळ ठरली. आता इथल्या शेकडो मुलांना त्यांच्या ऑनलाइन शिक्षणासाठी अविरत कनेक्टिव्हिटी उपलब्ध आहे.

सोनू सूद फाऊंडेशनसोबतचे हे असे दुसरे सहकार्य आहे. मागील वर्षि पंजाब आणि हरियाणा सार्कलमध्ये इंडस टॉवर्सने हरियाणातील मोरनी हिल्स येथे टॉवर उभारून या भागातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शिक्षण शक्य करून दिले होते.

# कर्जासाठी शरीर सुखाची मागणी करणाऱ्या बँक मॅनेजरवर कधी होणार कारवाई

**गोंदियः-** शहरातील कुडवा येथे राहणाऱ्या एका पिडीत महिलेच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी येथील यवतमाळ को ऑफ.बँकेच्या किशोर देशपांडे नामक कर्मचार्याच्या विरोधात कलम ३५४ (अ) भादंवि अन्वये २५ जून २०21 रोजी गुन्हा दाखल केला आहे. मात्र सदर प्रकरणात पाहिजे तशी कारवाई होत नसल्याची खंत पोलीस अधिक्षकांकडे सदर पिडीत तक्रारदार महिलेने केली आहे.

सदर महिलेचा आरोप आहे की तक्रार दिल्याच्या एका महिन्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यातही आरोपीला अटक केव्हा होणार? याबाबतीत त्या महिलेने जिल्हा पोलिस अधिक्षकांना पत्र लिहून विचारणा केल्यानंतर कुठे शहर पोलिसांनी या प्रकरणात कारवाईला हात लावल्याचे सदर तक्रारदार महिलेने म्हटले आहे. कुडवा येथे राहणाऱ्या या महिलेने व्यवसाय करण्यासाठी श्रीटॉकीज मार्गावर असलेल्या यवतमाळ को ऑफ बँकेत कर्जासाठी अर्ज केला. सदर तक्रारदार महिला चहा पावडरचा व्यवसाय करते. त्या बँक शाखेतून वर्ष २०१७-१८ च्या कालावधीत १५ लाख रूपये




कर्ज मिळण्याकरिता त्या महिलेने अर्ज केले होते. त्यावेळचे मॅनेजर असलेल्या अधिकाऱ्यांनी तिला वांरवार कार्यालयात बोलावून कर्ज मंजूर करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर त्यांनी ८ लाख रूपयाचे कर्ज मंजूर केले.

कर्ज वाढवून देण्याकरिता विनंती केली असता त्या अधिकाऱ्यांनी महिलेला शरीर सुखाची मागणी केली. याबाबतीत सदर पिडीत तक्रारदार महिलेने यवतमाळ को ऑफ बँकेचे नागपूर येथील अधिकारी येवतीकर यांची भेट घेत त्यांना या अधिकाऱ्यांच्या बाबतीत सांगितल्याचे पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. पिडीत तक्रारदार महिलेने सांगितले की, या घटनेच्या बाबतीत उशिरा का होईना शहर पोलिस स्टेशनला तक्रार केली.

पोलिसांनी प्रारंभी तक्रार घेण्यासच नकार दिला. नंतर तक्रार घेतली पण गुन्हा दाखल केला नाही. जेव्हा पोलिस अधिक्षकांना याबाबत तक्रार केली तेव्हा तक्रार दिल्याच्या जवळजवळ एक महिन्यानंतर तक्रार दाखल केली. जिल्हा पोलिस अधिक्षकांना माहिती दिली म्हणूनच तक्रार दाखल केली.नाही तर आताही तक्रार दाखल झाली नसती.मात्र अद्यापही पाहिजे त्याप्रमाणात कारवाई होत नसल्याची खंत पिडीत तक्रारदार महिलेने म्हटले आहे. तसेच पोलिस अधिक्षकानी यात लक्ष घालून न्याय द्यावे असेही म्हटले आहे.

# पुर्व विदर्भातील शेतकऱ्यांचे ७ कोटी रुपये बारदान्याचे शासनाकडे

**गोंदिया :** आदिवासी विकास महामंडळाच्या शासकीय धान खरेदी केंद्रावर सन २०१९-२० धानाची विक्री करणाऱ्या पूर्व विदर्भातील हजारो शेतकऱ्यांना ३६ लाख ५१ हजार बारदान्याचे ७ कोटी २१ लाख रुपये दोन वर्षाचा कालावधी लोटूनही अद्यापही मिळालेले नाहीत. ही रक्कम परत मिळावी यासाठी शेतकरी मागील दोन वर्षांपासून आदिवासी विकास महामंडळाच्या पायऱ्या झिजवीत आहेत.



पूर्व विदर्भात खरीप आणि रब्बी हंगामात शासकीय हमीभावाने शासकीय धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून धान खरेदी केली जाते. सन २०१९-२० मध्ये पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर आणि महाराष्ट्रातील पालघर आणि ठाणे जिल्ह्यांतील हजारो शेतकऱ्यांनी धान आणि ज्वारी आदिवासी विकास महामंडळाच्या धान खरेदी केंद्रावर विक्री केली.

या विभागाकडे बारदाना उपलब्ध नसल्याने त्याचा खरेदीवर परिणाम होऊ नये यासाठी शेतकऱ्यांना प्रतिबारदाना २० रुपये देऊन धान खरेदी करण्यात आली. बारदान्याची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल, असे या विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, ही रक्कम अद्यापही जमा केली नाही. बारदान्याच्या रकमेपोटी आदिवासी विकास महामंडळाकडे एकूण ३६ लाख ५१ हजार १६८ बारदान्याचे ७ कोटी २१ लाख रुपये थकीत असल्याची बाब रोशन बडोले यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत पुढे आली आहे. सर्वाधिक बारदान्याची रक्कम गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची असून, या दोन्ही जिल्ह्यांतील शेतक?यांचे ३ कोटी ६१ लाख रुपये थकले आहेत. चंद्रपूर १ कोटी ६७ लाख, नागपूर ४३ लाख आणि गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे १ कोटी ७७ लाख रुपये थकले आहेत. बारदान्याची रक्कम परत मिळावी यासाठी शेतकरी आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यालयाच्या पायऱ्या झिजवीत आहेत. मात्र, अद्यापही रक्कम शेतकऱ्यांना परत करण्यात आली नाही.

**न्यायालयात जाण्याचा इशारा दिल्यानंतर प्रक्रियेला सुरुवात**

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील शेतकरी रोशन बडोले यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत या विभागाकडून माहिती मागितली. त्यानंतर या माहितीच्या आधारावर आदिवासी विकास महामंडळाच्या नाशिक येथील कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला. सुरुवातीला या कार्यालयाने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, बडोले यांनी न्यायालयात जाण्याचा इशारा दिल्यानंतर या विभागाने बारदान्याचे पैसे परत करण्यासाठी शासनाकडे निधीची मागणी केल्याची माहिती आहे.

# लक्षांकाच्या ५७.०३ टक्के पीककर्ज वाटप

## ■ जिल्हा बँक आघाडीवर
## ■ पीककर्ज वाटपात व्यापारी उदासीन




**गोंदिया-** शेतकऱ्यांना खरीप हंगामात शेती करण्यासाठी पैशाची अडचण जाणवू नये, यासाठी नाबार्ड आणि शासनाने जिल्हा, राष्ट्रीयीकृत आणि ग्रामीण बँकांना पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे. यातंर्गत जिल्ह्यात ३० जूनपर्यंत लक्षांकाच्या ५७.०३ टक्के पीककर्ज वाटप झाले आहे. विशेष म्हणजे, पीककर्ज वाटपात जिल्हा बँक आघाडीवर असून व्यापारी बँक उदासिन असल्याचे दिसून येत आहे.


राज्य शासन आणि नाबार्डने खरीप हंगाम २०२१-२२ या वर्षासाठी ३०० कोटी रुपयांच्या पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यासाठी जिल्हा बँकेला १६७ कोटी ८५ लाख, राष्ट्रीयकृत बँकांना ९ कोटी १६ लाख आणि ग्रामीण बँकांना ३ कोटी ६० लाख रुपयांच्या पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले आहे. पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश सर्व बँकांना आहेत. खरीप हंगामाला सुरुवात झाली असून शेतकऱ्यांना खते, बियाणे, कृषी साहित्य आणि शेतीच्या मशागतीची कामे करण्यासाठी पैशाची गरज आहे. पैशाची गरज भागविण्यासाठी शेतकऱ्यांना सावकारांच्या दारात उभे राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी पीककर्ज उपलब्ध करून दिले आहे.

या अंतर्गत आतापर्यंत जिल्हा बँकेने लक्षाकांच्या ७८.७९ टक्के पीक कर्जाचे वाटप केले आहे. तर व्यापारी बँकांनी २१.३७ टक्के व ग्रामीण बँकेने ५१.४६ टक्के पीककर्जाचे वाटप केले आहे. यंदा उन्हाळी हंगामातील धान खरेदीची समस्या कायम असल्याने शेतकरी धान विक्रीच्या प्रक्रियेत अडकला आहे. तोडगा निघत नसल्याने शेतकरी आता पीक कर्जाची उचल करण्यासाठी बँकांमध्ये गदी करीत आहेत. जिल्हा बँक ही शेतकऱ्यांना आपली बँक वाटत असल्याने शेतकरी सर्वाधिक पीक कर्जाची उचल करण्यासाठी याच बँकेत गदी करीत आहेत.

**व्यापारी व ग्रामीण बँकांना ताकीद**

खरीप हंगाम २०२१-२२ पीक कर्ज वितरण संदर्भात नुकतीच बँक अधिकाऱ्यांची जिल्हास्तरीय बैठक जिल्हाधिकारी राजेश खवले यांच्या अध्यक्षतेखाली २ जुलै रोजी पार पडली. यावेळी त्यांनी बँकांनी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देऊन काही राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांची कर्ज वाटपाची टक्केवारी अतिशय कमी असल्यामुळे नाराजी व्यक्त करुन कामगिरी सुधारण्याची ताकीद त्यांनी यावेळी बँकांना दिली

# पशुसंवर्धन पायाभुत सुविधा विकास निधी योजनेचा लाभ घ्या



**गोंदिया:** केंद्र शासनाने २०२०-२१ या वर्षापासून पशुसंवर्धन पायाभुत सुविधा विकास निधी या नवीन योजनेस मंजुरी प्रदान केली आहे. २०२१-२२ या वर्षात सदर योजनेकरीता १५ हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. इच्छुक व्यवसायीक, उद्योजक व संस्थांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी केले आहे. योजनेंतर्गत दूध प्रक्रिया, मांस निर्मिती व प्रक्रिया, पशुखाद्य, टीएमआर ब्लॉक्स, बायपास प्रोटीन, खनिज मिश्रण, मुरघास निर्मिती, पशुपक्षी खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा या उद्योग व्यवसायांना ९० टक्के कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असून व्याज दरामध्ये ३ टक्के सुट देण्यात येणार आहे. योजनेच्या सर्व मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाच्या पशुपालन व डेअरी विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

योजनेच्या लाभासाठी संकेतस्थळावरील पोर्टलद्वारे ऑनलाइन प्रस्ताव सादर करावयाचा आहे. केंद्र शासनाने वर नमूद उद्योग व्यवसायासोबतच लिंग विनिश्चित वीर्य मात्रा निर्मिती, बाह्य फलन केंद्र (आयव्हीएफ), पशुधनाच्या शुद्ध वंशावळीच्या प्रजातींचे संवर्धन या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. या योजनेचा व्यक्तीगत व्यावसायिक, शेतकरी उत्पादक संस्था, खासगी संस्था, कलम ८ अंतर्गत स्थापन झालेल्या कंपनी यांना लाभ घेता येईल. जिल्ह्यातील पशुपालन व दुग्ध व्यवसायाच्या प्रगतीसाठी केंद्र शासनाचा पशुसंवर्धन पायाभुत सुविधा विकास निधी उपयुक्त असून जिल्ह्यातील इच्छुक व्यवसायीक, उद्योजक व संस्थांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी केले आहे.

## प्रवाशांचे मोबाईल चोरणाऱ्या आरोपीला अटक

**गोंदिया:** रेल्वेगाडीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे मोबाईल चोरणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला गोंदिया रेल्वे पोलिसांनी आज, २ जून रोजी अटक केली. त्याच्याकडून तीन मोबाईल जप्त करण्यात आले. आकाश मरकाम (१९) रा.बैगापारा, छ.ग. असे आरोपीचे नाव आहे.

गोंदिया रेल्वे स्थानकाच्या फलाट क्र. ३ वर दुपारी अहमदाबाद-पुरी एक्सप्रेस गाडी आली. यावेळी रेल्वेगाडीतील सुरक्षा अधिकाऱ्याने रेल्वेच्या काही बोगीमध्ये एक इसम संशयास्पद रित्या हालचाली करीत असल्याचे फलाटावरील रेल्वे सुरक्षा अधिकाऱ्यांना सांगितले. दरम्यान रेल्वे सुरक्षा अधिकाऱ्यांनी बोगींमध्ये त्याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र सुरक्षा कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले.

दरम्यान, त्याच्या झडती घेतली असता त्याच्याजवळ ३० हजार किमतीचे तीन मोबाईल आढळले. तसेच प्रवाशांचे मोबाईल चोरी करुन विक्री करीत असल्याचे आरोपीने कबूल केले. त्याच्यावर गोंदिया रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक अनिता खेडकर यांच्या मार्गदर्शनात निरीक्षक उषा बिसेन, उपनिरीक्षक मयंक मिश्रा, उपनिरीक्षक प्रविण भिमटे, प्रभारी अधिकारी नासिर खान, हवालदार ओमप्रकाश सेलोटे, नंदकिशोर नारनवरे, किशोर ईश्वर, विनोद धांडे यांनी केली.

# भरती प्रकिया सुरुकरा,ओबीसी संघर्ष समितीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन





**अर्जुनी मोरगावः-** राज्य लोकसेवा आयोग व ईतर विभागाच्या आतापर्यत रखडलेल्या नियुक्त्या, पदभरती त्वरित करा. ओबीसी संघर्ष कृती समिती द्वारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना तहसीलदार अर्जुनी मोरगाव द्वारे निवेदन पाठविले आहे.

ओबीसी संघर्ष कृती समितीच्या निवेदनात म्हटले आहे की, Covid-१९ च्या प्रादुर्भावामुळे, मराठा आरक्षण-तसेच ईतर कारणामुळे पद भरती रखडली आहे. विद्यार्थ्यांचे वय वाढत आहे. मागच्या सरकारनी महापोर्टल मार्फत भरती केली त्यात अनेक घोटाळे झाले. हे पोर्टल बंद करुन MPSC मार्फत परीक्षा घेवुन यात वर्ग ३व४ ची पदे सुद्धा भरावीत. एमपीएससी आयोगाची सदस्य संख्या ६असायला पाहिजे ती मागील ३ वर्षापासून दोनच सदस्य संख्या आहे त्यात नवीन सदस्य भरावेत, , कंत्राटी पद्धत रद्द करून पूर्णवेळ नोकरी द्यावी, पोलिस भरती करण्यात यावी, कारोना मुळे वयोमर्यादा वाढ करावी,महाआयटी या सरकारी कंपनीवर SIT लावून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अन्यथा आक्रोश मोर्चा काढण्यात येईल अशा आशयाचे निवेदन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उप मुख्यमंत्री अजितदादा पवार, ओबीसी कल्याणमंत्री विजय वडेट्टीवार, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोगयांना दिले आहे.

यावेळी आ. मनोहर चंद्रिकापुरे, तहसीलदार विनोद मेश्राम ओबीसी संघर्ष कृती समितीचे जिल्हा उपाध्यक्ष व बाजार समितीचे प्रशासक उद्धव मेहेंदळे, राष्ट्रवादी काँगेस चे तालुकाध्यक्ष व बाजार समितीचेचे मुख्य प्रशासक लोकपाल गाहाने, बाळू हुकरे, कैलास कासार व ईतर उपस्थित होते.

# जनाटोलो येथील पाणी पुरवठा योजना शोभेची वास्तू

**गोंदिया-** तालुक्यातील जनाटोला येथे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पाणी पुरवठा योजना पुर्णत्वास येऊन देखील गावकऱ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसल्याने पाण्यासाठी त्यांची पायपीट कायम आहे. गावातील योजना ग्रामस्थांसाठी शोभेची वास्तू ठरली आहे. जनाटोला येथील पाणी पुरवठा योजना सुरू करवी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ता फिरोज बनसोड यांनी प्रशासनला दिला आहे.



पिण्याचे शुद्ध पाणी प्रत्येक नागरिकाची मुलभूत गरज आहे. शासनही प्रत्येक नागरिकाला पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कटीबद्ध आहे. असे असले तरी संबंधित यंत्रणेच्या दुर्लक्षीतपणामुळे आजही अनेक गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत आहे. तालुक्यातील जनाटोला येथे तीन वर्षांपूर्वी पाण्याच्या टाकीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. परंतु अद्यापपर्यंत गावकऱ्यांना पाण्याचा थेंबही मिळत नाही. उन्हाळ्याच्या दिवसांत गावात पाण्याची समस्या अधिकच तिव्र होते.

ग्रामस्थांना पाण्यासाठी चारही दिशा भटकंती करावी लागते. पाणीपुरवठा योजना पुर्णत्वास येऊन तीन वर्षे लोटली असताना ग्रामवासी पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. योजनेत तांत्रिक दोष असल्याचे सांगीतले जाते. संबंधित यंत्रणेने योजनेतील दोष दूर करून जनाटोलावासीयांनी पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे, अन्यथा ग्रामवासीयांसह आंदोलन करण्याचा ईशारा फिरोज बनसोड यांनी दिला आहे.

# शासकीय योजनांचा लाभ घेऊन आपले जीवन सुकर करा-पोलिस अधीक्षक पानसरे



**सालेकसाः-** नक्षलग्रस्त अतिदुर्गम भागात नक्षल चळवळीला रोखण्याच्या उद्देशाने तसेच आदिवासी बांधवामध्ये शासन व पोलिस प्रशासनाप्रती विश्वासाची व आपुलकीची भावना निर्माण व्हावी. तसेच शासकीय यंत्रणा ही अतिदुर्गम भागात वास्तव्यास असणाऱ्या जनतेकरिता सतत सहकार्य करीत असल्याची भावनानिर्माण व्हावी या दृष्टीने २ जुलै रोजी पोलिस स्टेशन सालेकसा अंतर्गत पोलिस बेस कॅम्प मुरकुटडोह येथे अधीक्षक विश्व पानसरे व अप्पर पोलिस अधीक्षक अशोक बनकर यांच्या संकल्पनेतून कम्युनिटी पोलिसिंग अंतर्गत गरजू शाळकरी विद्यार्थिनींना सायकलचे वितरण करण्यात आले. घरापासून ते शिक्षण घेत असलेले शाळेचे अंतर खूप लांब असल्याने त्यांच्या अडचणीची जाणीव लक्षात घेत मुलींच्या भावी शिक्षण लक्षेत घेवून मुरकुटडोह भागातील एकूण ७ विद्यार्थिनींना पोलिस अधीक्षक पानसरे यांच्याहस्ते सायकल वाटप करण्यात आले.

यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक अशोक बनकर, उपविभागीय पोलिस अधिकारी जालींदर नालकुल, सालेकसाचे ठाणेदार प्रमोद बघेले, बेस कॅम्प मुरकुटडोहचे प्रभारी अधिकारी सपोनि. दिनेश बागुल, पोउपनि उल्लेवार, पोउपनि. संजय नाग (छ.ग.) पोउपनि. मोहित करोलिया, भगतसिंग, मुव्हेल धनसिंग, तसेच इतर अधिकारी व पोलिस अंमलदार व गावातील प्रतिष्ठीत नागपूर उपस्थित होते.

दरम्यान नक्षलग्रस्त भागातील नागरिकांनी नक्षल्यांच्या भुलथापांना बळी न पडता, शासकीय योजनांचा लाभ घेवून आपले जीवन सुकर करावे व शासनाच्या मुख्य पवाहात सामील व्हावे असे मत व्यक्त केले. तसेच विद्यार्थिनींना पोलिस अधीक्षक विश्व पानसरे यांनी त्यांच्या उज्जवल भविष्यासाठी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमांतर्गत कोरोना संसगार्चा लक्षात घेवून सामाजिक अंतर, मास्क व सॅनिटायझरचा वापर करण्यात आला.

# कार्यकर्त्यांनी पक्षाची विचारधारा जनमानसांपर्यंत पोहोचावी-राजेंद्र जैन



**गोंदिया:** जिल्ह्याला राष्ट्रवादीचे नेते खासदार प्रफुल पटेल यांच्यासारखे खंबीर नेतृत्व मिळाले आहे. कोविड संक्रमणाच्या काळात जे कार्य खा. प्रफुल पटेल यांनी केले ते इतर कुणीही करू शकत नाही. गोंदियाला ऑक्सीजन पुरवठा व इतर आरोग्य सुविधाची कमतरता भासु दिली नाही. खा. पटेल यांचे नेतृत्व शेतकरी, कामगार, मजूर यांच्या हिताचे असून त्यांनी नेहमी सामान्य माणसाचाच विचार केला आहे. कार्यकर्ता मजबूत झाला पाहिजे तरच मतदातापर्यंत पक्षाचे जनहिताचे कार्य पोहचतील. यामुळे कार्यकर्त्यांनी सक्षम व सक्रिय होऊन राष्ट्रवादी काँग्रेसची विचारधारा सर्वसामान्यांपयंर्त पोहोचवावी, असे आवाहन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.


गोंदिया तालुक्यातील पांजरा, खमारी, आसोली व कामठा जि.प. क्षेत्रातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना माजी आमदार राजेंद्र जैन बोलत होते.

सभेला राकाँचे जिल्हाध्यक्ष विजय शिवनकर, राजलक्ष्मीताई तुरकर, कुंदन कटारे, बाळकृष्ण पटले, जगदीश बहेकार, केतन तुरकर, गणेश बर्डे, डॉ.मोहित गौतम, उषा मेर्शाम, किरण बारापात्रे, सपना अग्रवाल, प्रतीक हरिणखेडे, दिनेश हरिणखेडे, सुनील पटले, शैलेश वासनिक, गंगाराम कापसे, सुरेश चुटे, मनोज दहीकार, रामू चुटे, रेखा जमदाळे, सीमा मेंढे, विजय ठाकूर, पृथ्वीराज रहांगडाले, नृपाराज जांभुळकर, विजय कुमार रहांगडाले, डॉ. तुळशीराम शिवणकर, दुळीराम भाकरे, टिलक पटले, सुरेश कावडे, नागो बन्सोड, जयेंद्र कुंभारे, धर्मेंद्र गणवीर, पवन धावडे, कान्हा बघेल, आरजू मेश्राम, सहेसराम उपवंशी, पुरणलाल उके, आशिष ठाकूर, राजेंद्र नागपुरे, कमलसिंह बघेल, रमेश बावनथडे, दीपक राऊत, कैलास मेश्राम, संजय भेंडारकर, ईश्वरदास पाथोडे, दीपक नारनवरे, हिवराज पटले, बन्सीधर अग्रवाल, अरविंद गणवीर, खेमेंद्र कटरे, बबलू कटरे, सत्यवान बनकर, बळीराम निखाडे, उमेश मानकर, राजेश वाकले, चिंधू गायधने, सुनील मानकर, प्रेमलाल मानकर, कोमल नांदगावली, रेखराम लांजेवार, डी.एच.बोरकर, मोनू मेश्राम, कपिल बावनथडे, कुणाल बावनथडे व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थितीत होते. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष विजय शिवनकर यांनी जिल्हा परिषद क्षेत्रातील प्रमुखांना पाटी संगठन मजबुतीने कार्य करण्यासोबतच प्रत्येक बुथ पातळीवर कार्यकर्ता सक्षम असला पाहिजे व जि.प. व प. स. निवडणूक बाबतीत पक्ष संघटन बळकट करण्यावर मार्गदर्शन केले.

# त्या कुटुंबासाठी २० कर्मचारी ठरले देवदूत

**गोंदिया:** जिल्ह्यामध्ये सकारात्मतेचे वारे वाहते आहे. अर्जुनी मोरगाव येथे अनाथ झालेल्या मुलांच्या मदतीसाठी सरकारी अधिकारी नाथ बनून धावून गेले. सालेकसा तालुक्यातील मोहारे कुटुंब असो, गोरेगाव तालुक्यातील खडीपार येथील दोन चिमुकल्या आणि ८० वर्षांच्या वृद्ध आजी अथवा रक्ताचा मुलगा गमावलेल्या त्या आईला प्रशासनातील अधिकाऱ्यांनी मदतीचे हात देत मोलाचे सहकार्य केले. आता असाच प्रसंग अर्जुनी मोरगाव तालुक्यातून पुढे आला असता आता जिल्ह्यातील २० कर्मचारी त्या कुटुंबासाठी जणू विठ्ठला सारखेच धाऊन आले आहे.

प्रसार माध्यमांनी नेहमीच आधारस्तंभाचे कार्य केले आहे. अशीक एक घटना प्रसार माध्यमातून पुढे आली. अर्जुनी मोरगाव येथील एका टपरीत रामदास कोलते यांचे दुचाकी दुरुस्तीचे दुकान होते. मिळेल ते काम करायचे आणि कुटुंबाचा गाडा पुढे हाकलायचा असा दिनक्रम चालला होता. गरीब परिस्थितीतही कुटुंब आनंदी होते. कुटुंबात सारे काही व्यवस्थित चालले होते. परंतु या कुटुंबावर काळाची दृष्ट नजर पडली आणि रामदास यांच्या पत्नीच्या हृदयाचे वॉल निकामी झाले. तिच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. कुटुंबाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली परंतु यश आले नाही. शेवटी ५ डिसेंबर २०२० रोजी तिने या जगाचा निरोप घेतला. तिच्या उपचारासाठी कुटुंबाची सर्व ठेव खर्च झाली. कुटुंब कर्जबाजारी बनले आणि अशातच कोरोनाने महाभयंकर संकट चाल करुन आले. कोरोनाने रामसास यांना घेरले. रामदास यांना कोविड केअर सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. कुटुंबाने




रामदास यांना वाचविण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. परंतु अखेर कोरोनाने रामदास यांचाही बळी घेतला. यातही या कुटुंबाच बराच खर्च झाला. होते नव्हते ते पैसे खर्च झाले. कर्जाचा डोंगर वाढतच गेला. रामदास यांच्यामागे त्यांचे म्हातारे आई-वडील उरले आणि ज्यांना जगाची नीटशी ओळखही झाली नाही अशा अबोध तीन बालिका उरल्या. कुटुंबामध्ये कुणीही कमावते नाही आता या तीन लहान मुलींनी कसे जगावे? आणि घरातील वृद्धांनी काय खावे? असा प्रश्न निर्माण झाला. याबाबतचे वृत्त वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध होताच गोंदियाचे जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी या प्रकरणी कर्मचाऱ्यांची मदतीकरिता पुढे यावे असे आवाहन केले. आणि या आवाहनाला प्रतिसाद जिल्ह्यातल २० कर्मचारी धाऊन आले. हे २० कर्मचारी आता या कुटुंबाला दरमहा ५०० रुपये असे १ वर्षापर्यंत देणार आहेत. त्यामुळे या कुटुंबाला एक वर्षभर दरमहा दहा हजार रुपये मिळतील. एक वर्षानंतर ज्यांना शक्त असेल ते स्वत: पाचशे रुपयाची मदत देणे सुरु ठेवतील. ज्यांना शक्य नसतील ते आपल्या जागी मदत करणाऱ्या दुसऱ्या एका कर्मचाऱ्याला तयार करतील. आणि अशा रितीने कोलते कुटुंबाची मदत होत राहील.

# इंधन दरवाढविरोधात राकाँचे ठिय्या आंदोलन






**गोंदिया:** केंद्र शासनाने केलेल्या डिझेल, पेट्रोल व घरगुती गॅस सिलेंडर दरवाढीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आज, ५ जुलै रोजी गोंदिया व अर्जुनी मोर येथे ठिय्या आंदोलन करण्यात आले. दरम्यान दरवाढ निषेधाचे निवेदन तहसीलदारांमार्फत केंद्र शासनाला पाठविण्यात आले.

गोंदिया शहरात माजी आ. राजेंद्र जैन, माजी म्हाडा सभापती नरेश माहेश्वरी, राकाँ जिल्हाध्यक्ष विजय शिवणकर यांच्या नेतृत्वात सायकल रॅली काढून निर्देशने करण्यात आला. दरम्यान, नवीन प्रशासकीय इमारतीसमोर ठिय्या आंदोलन करुन इंधन दरवाढ मागे घेण्याची मागणी करुन केंद्र शासनाचा निषेध नोंदविण्यात आला व तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्या तेलाचे दर कमी असताना देशात इंधन दरवाढ झाल्याने महागाई वाढत चालली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना जीवन जगने कठीण झाले असून केंद्र शासनाने इंधन दर कमी करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी राजलक्ष्मी तूरकर, प्रभाकर दोनोडे, किशोर तरोणे, केतन तुरकर, गणेश बरडे, रफिक खान, सुनील भालेराव, सुशीला भालेराव, बाळकृष्ण पटले, के. बी. चौहान, अशोक शहारे, शिव शर्मा, मनोहर वालदे, मोहन पटले, सुरेश हर्षे, कमलबापू बहेकार, चुन्नीभाऊ बेंद्रे, राजेश कापसे, गोविंद तुरकर, रवी मुंदडा, सतीश देशमुख, विनीत सहारे, विजय रगडे, प्रतीक भालेराव, नानू मुदलियार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

**अर्जुनी मोरगाव** : तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन तालुका अध्यक्ष लोकपाल गहाणे यांच्या नेतृत्वात करण्यात आले. दरम्यान तहसीलदार विनोद मेश्राम यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात किशोर तरोणे, नामदेव डोंगरवार, बंडू भेडारकर, यशवंत गणवीर, सोनदास गणवीर, भोजराम राहिले, राकेश लांजे, योगेश नाकाडे, दिंनदयाल डोंगरवार, यशवंत परशुरामकर, दीपक सोनवणे, उद्धव मेहंदळे, श्रावण मेंढे, सुशीला हलमारे, माधुरी पिंपळकर, चित्रलेखा मिश्रा, मनीषा तरोने, निसार पठाण, निशा मस्के आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**सडक अर्जुनी** : पेट्रोल, डीझेल व ऐल.पी.जी याच्या वाढलेल्या किमती विरोधात राष्ट्रवादी कांग्रेस सडक अर्जुनी तर्फे केंद्र सरकारने जिवनाशक्य वस्तूचे भाव वाढविले. त्या विरोधात निदर्शने करुन तहसीलदार यांना पंतप्रधान यांच्या नावे असलेले निवेदन देण्यात आले. त्यावेळी तालुका अध्यक्ष अविनाश काशिवार, माजी जि.प. सदस्य रमेश चुर्हे, मिलन राऊत, नरेश भेडारकर, ऐफ आर टि शहा महासचिव किसान सभा, दिनेश कोरे, उमराव मांढरे, पुष्पमाला बडोले, मंजुताई डोंगरवार ,वंदना डोंगरवार, शिवाजी गहाने, देवाजी बनकर, वंदना थोटे, शुभांगी वाढवे ,वंदना डोये, डी.यू. रहागडाले, दिलीप गभने, अमिन शेख, आशिष येरने, शशीकला टेभूर्ने, अफ्रोज शेख व अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गोरेगाव:** पेट्रोल , डीझेल व ऐल.पी.जी याच्या वाढलेल्या किमती विरोधात राष्ट्रवादी कांग्रेस गोरेगावच्यावतीने पंतप्रधानांच्या नावे तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. शिष्टमंडळात माजी खासदार डॉ. खुशाल बोपचे, प्रदीप जैन, डॉ. श्रीप्रकाश रहांगडाले, बाबा बोपचे, अनिता तुरकर, लालचंद चव्हाण, रामेश्वर हरिणखेडे, डॉ. संजय रहांगडाले, रंजू अगडे, कल्पना बहेकार, केवल बघेले, सोमेश्वर बघेले, पंकज रहांगडाले, महेंद्र रहांगडाले, प्रतीक पारधी, महेंद्र चौधरी, कल्पना शेवते, खुशाल वैद्य यांचा समावेश होता.

**देवरी:** पेट्रोल , डीझेल व ऐल.पी.जी याच्या वाढलेल्या किमती विरोधात राष्ट्रवादी कांग्रेस देवरी तालुका पक्षाच्यावतीने सोमवारी जनआक्रोश आंदोलन करण्यात आले.

राणी दुर्गावती चौकातील पक्षाच्या कार्यालयासमोर पक्षप्रमुख कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमेश ताराम व तालुकाध्यक्ष सी.के. बिसेन यांच्या मार्गदर्शनात केंद्र व मोदी सरकारच्या विरोधात कार्यकर्त्यांनी जोरदार नारेबाजी करुन निषेध नोंदविला. तर राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या तालुका अध्यष पारबता चांदेवार यांच्या नेतृत्वात महिला पदाधिकाऱ्यांनी नारेबाजी करीत गॅस व दुचाकींना फुलांचा हार चढवून प्रतीकात्मक गॅस सिलींडला तिलांजली वाहिली.

**तिरोडा:** पेट्रोल , डीझेल व ऐल.पी.जी याच्या वाढलेल्या किमती विरोधात राष्ट्रवादी कांग्रेस तिरोडाच्यावतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी महिला जिल्हाध्यक्ष राजलक्ष्मी तुरकर, तालुकाध्यक्ष प्रेम रहांगडाले, रविकांत बोपचे, डॉ. योगेंद्र भगत, अजय गौर, डॉ. किशोर पारधी, वाय.टी.कटरे, माजी जि.प.सदस्य पटले आदि उपस्थित होते.







## लोकशाहीची क्रुर थट्टा करणाऱ्या राज्य सरकारचा निषेध



**गोंदिया:** ५ जुलै–राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व काँग्रेस प्रणित महाविकास आघाडी सरकारने विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन दोन दिवस ठेवून राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. ही लोकशाहीची कुर थट्टा असून भारतीय जनता पाटी याचा निषेध करुन "महाराष्ट्रातील लोकशाही वाचवा दिन' पाळत असल्याचे निवेदन ५ जुलै रोजी राष्ट्रपती व राज्यपालांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्यात आले.

जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर यांच्या मार्गदर्शनात निवेदन देताना, माजी आ. रमेश कुथे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय टेंभरे, ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनलाल ठाकरे, किसान मोर्चा महामंत्री अशोक हरिणखेडे, ग्रामीण मंडळ महामंत्री मनोज मेंढे, नेत्रदिप गावंडे, बबली ठाकूर, सोमेश्वर तुरकर आदी उपस्थित होते. निवेदनानुसार, या दोन दिवसाच्या अधिवेशनात राज्यातील कोणत्याही महत्वाच्या प्रश्नांची चर्चा या अधिवेशनात होणार नसून विधिमंडळ सदस्यांचे घटनेने दिलेले अधिकार, प्रश्न विचारणे, स्थगन प्रस्ताव देणे, लक्षवेधी सूचना मांडणे आर्दीवर गदा आणली आहे. जनतेच्या प्रश्नाला उत्तरे द्यायला हे सरकार घाबरत असल्याचे स्पष्ट झाल्याने ही लोकशाहीची क्रुर थट्टा आहे. त्यामुळे राष्ट्रपती, राज्यपालांनी याबाबत कठोर भूमिका घेऊन निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## अर्जुनी विधानसभा क्षेत्रात शंभर टक्के छायाचित्र मतदार यादी

अर्जुनी मोर: राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीत नावासमोर छायाचित्र असणे अनिवार्य केले आहे. मात्र अनेक विधानसभा मतदारसंघात मतदारांनी त्यांचे छायाचित्र निवडणूक विभागाकडे जमा केली नाही. अशा मतदारांची नावे ४ जुलै नंतर मतदार यादीतून वगळण्यात येत आहे. मात्र याला अपवाद अर्जुनी मोर विधानसभा क्षेत्र ठरला आहे. अर्जुनी मोर विधानसभा क्षेत्राच्या मतदार यादीत नावाचा समावेश असलेला व छायाचित्र नसलेला एकही मतदार नाही. शंभर टक्के मतदारांना ओळखपत्राचे वाटप करण्यात आले आहे. मतदार याद्या अद्यावत करण्यात अर्जुनी मोर विधानसभा क्षेत्र नागपूर विभागात प्रथम ठरला आहे.अर्जुनी मोर विधानसभा क्षेत्रात मतदार यादी अपडेट ठेवण्याच्या कामात तालुक्यातील निवडणूक विभागाने सातत्य ठेवले होते. दरम्यान मतदार यादीत पूर्णतः तांत्रिक चुका दुरुस्त केल्यात. रेसिड्यूलचे काम शंभर टक्के पूर्ण केले आहे. फोटो बनवण्याचे काम समांतर निकाली काढून, मतदार यादी अद्यावत करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या



निर्देशानुसार, जानेवारीत सुरू असलेले मतदार नोंदणी कार्यक्रमापासून निवडणूक विभागाच्या चमूने उत्कृष्ट काम केले आहे. राज्य निवडणूक आयोगाने मतदार याद्या अद्ययावत करण्याचे निर्देश दिले होते. जिल्हाधिकारी राजेश खवले, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार याद्यांचे काम शंभर टक्के पूर्ण केले आहे. अशी माहिती अर्जुनी मोरगावचे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार विनोद मेश्राम यांनी दिली.

बीएलओ, तलाठी यांच्या सहकार्याने विधानसभा क्षेत्रातील संपूर्ण मतदारांचे छायाचित्र एकत्र केले. त्यामुळेच मतदार संघातील एकाही मतदारांचे नाव छायाचित्रा विना नाही. यात मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शिल्पा सोनाले यांच्या मार्गदर्शनाखाली, मतदार नोंदणी अधिकारी उषा चौधरी, सचिन गोसावी, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार सुनील भानारकर, संगणक परिचालक विजय कोकोडे यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार विनोद मेश्राम यांनी सांगीतले.


**नगर पंचायत कार्यालय, गोरेगांव ता.गोरेगांव, जि. गोंदिया (महा.)**

Email Id:npgoregaon1@gmail.com phone No.07187291104

जा.क्र./नपगो/कावि/१००६/०२१
दिनांक:– ०५/०७/२०२१

**वार्षिक निविदा सुचना**
**सन २०२१-२२ (दुसरी वेळ)**

गोरेगांव नगर पंचायतच्या विविध विभाग अंतर्गत सन २०२१–२२ करीता पंजिकृत/अनुभवी कंत्राटदार/पुरवठाधारक यांचेकडून सिलबंद वार्षिक निविदा मागविण्यात येत आहे. त्या करीता निविदा प्रपत्र दिनांक ०६/०७/२०२१ ते दिनांक १३/०७/२०२१ सकाळी ११.०० वाजेपासून ते सायं. ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील. निविदा दिनांक १४/०७/२०२१ ला दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल व निविदा दिनांक १४/०७/२०२१ रोजी शक्य झाल्यास दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येईल.

**श्रीमती हर्षला राणे**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत गोरेगाव**


## बोरकन्हार येथील शिक्षकाची गळफास लावून आत्महत्या

**आमगाव–** तालुक्यातील बोरकन्हार येथील जिप शाळेत कार्यरत असलेले पदवीधर शिक्षक सुनील मुटकुरे यांनी गळफास लावून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना ५ जुलै रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. आमगाव तालुक्यातील बोरकन्हार येथे घडली. जिप शाळेत कार्यरत असलेले पदवीधर शिक्षक सुनील मुटकुरे यांनी आज पहाटे ५ च्या सुमारास गळफास लावून आत्महत्या केली. मृतदेह रिसामा येथील राधा–कृष्ण मंदिर परिसरात असलेल्या विहिरीत पाणी काढण्यासाठी असलेल्या



गिरणीला दोरखंडाने गळफास लावलेल्या स्थितीत त्यांचा मृतदेह अढळून आला. आत्महत्येचे कारण अद्याप कळू शकले नाही. मुटकुरे हे नम्र स्वभावाचे होते, इंग्रजी विषयात निपुण होते, झाडांवर कलम करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा,मुलगी, पत्नी व बराच मोठा आप्तपरिवार आहे. मृतदेह उत्तरीय तपासणी करिता पाठविण्यात आले असून पो. स्टे. आमगाव येथे मर्ग दाखल करण्यात आला असून पुढील तपास पो.नि.नाळे यांच्या मार्गदर्शनात स.फौ.कन्नमवार करीत आहेत.

## कोविडमुक्त गावातील शाळा सुरू करण्याचा सरकारचा निर्णय मागे

**गोंदिया:** गत वर्षभरापासून शाळा बंद व मुले घरी राहण्याचे अजून जे दुष्परिणाम लक्षात आले आहेत त्यात म्हणजे सामाजिक कौशल्यांचे नुकसान, मोबाईल, इंटरनेटचा गैरवापर व गेम्सचा अतिरेकी वापर, डिप्रेशन, ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहणे त्यामुळे मानसिक तणाव, काही मुलांनी केलेली आत्महत्या, घरगुती हिंसेचे वाढते प्रमाण, बालविवाह, बालमजुरीचे वाढते प्रमाण, मुलींचे ड्रॉपआऊट व घर–शेती कामात ठेवणे इ. मोठया प्रमाणावर सामाजिक नुकसान लक्षात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणाचा लाभ व्हावा यासाठी कोविड–मुक्त क्षेत्रात शाळा सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार ५ जुलैपासून राज्यातील कोविड–मुक्त क्षेत्रात ग्रामपंचायती / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ठरावांनी विशिष्ट निकषांच्या आधारे पहिल्या टप्प्यात शाळेतील इयत्ता ८ ते इयत्ता १२ वीचे वर्ग सुरू करण्यास शासन मान्यता देण्यात आली होती.दरम्यान शासनाने हा निर्णय ६ जुर्ले रोजी परत घेतल्याने पुन्हा शाळा सुरु होण्याचा मार्ग बंद झाला आहे.

सन २०२० या वर्षात राज्यामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु झाला. त्यानंतर राज्यातील कोरोनाची परिस्थिती काही कालावधीनंतर सुधारल्याने राज्य शासनाने टप्याटप्याने शाळा सुरु करण्यास परवानगी दिली. राज्य शासनाने दि. १५ एप्रिल, २०२१ पासून राज्यात पुन्हा लॉकडाऊन जाहीर केले. त्यानंतर राज्य शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे राज्यातील लॉकडाऊन उठविण्यात आले. तसेच इतर आस्थापना देखिल सुरू करण्यास टप्प्याटप्याने मान्यता देण्यात आली आहे.

मागील वर्षी शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने त्यांच्या दि. १४ जून २०२१ च्या पत्रान्वये विदर्भ



वगळता राज्यातील इतर भागात दि. १५ जून २०२१ पासून व विदर्भात दि. २८ जून २०२१ पासून शैक्षणिक वर्ष सुरू करण्याबाबत जाहिर केले. वरील दिनांकापासून शिक्षकांच्या उपस्थितीबाबत निर्देश देण्यात आले आहे. राज्यात कोविड संबंधी डेटा/आकडेवारी व तज्ञांचे मत लक्षात घेता असे दिसते की, सध्या १० वर्षांपेक्षा कमी वयोगटाच्या मुलांना कोविड संसर्ग होण्याची सर्वात कमी शक्यता आहे, तसेच १८ वयापर्यंतच्या मुलांना सध्यातरी सदर संसर्ग होण्याची कमी शक्यता आहे. शाळा बंद असल्यामुळे मुले एक वर्षापासून घरी बसली आहेत व त्यामुळे त्यांच्यावर शारिरीक, मानसिक व दुष्परिणाम होत आहे, शिवाय त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. पुढे जाऊन जस–जसे दिवस जातील, तस–तसे सदर नुकसान भरून काढणे कठीण जाईल.

### शाळेत आरोग्य, स्वच्छतेबाबत मार्गदर्शक सूचना

शाळेत स्वच्छता व निर्जंतुकीकरण विषयक सुविधा सुनिश्चित करणे: शाळेत हात धुण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे. जंतूनाशक, साबण–पाणी इत्यादी आवश्यक वस्तुंची उपलब्धता तसेच शाळेची स्वच्छता व निर्जंतुकीकरण स्थानिक प्रशासनाने (ग्रामीण व शहरी) सुनिश्चित करावी. एखाद्या शाळेत क्वारंटाईन सेंटर असल्यास स्थानिक प्रशासनाने ते इतर ठिकाणी स्थलांतरित करावे. स्थानिक प्रशासनाने अशा शाळेचे हस्तांतरण शाळा व्यवस्थापनाकडे करण्यापूर्वी त्याचे पूर्णत: निर्जंतुकीकरण करावे.

शिक्षकांची कोविड–१९ बाबतची चाचणी: संबंधित शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कोविड–१९ साठीची आरटीसीपीआर चाचणी करावी.

बैठक व्यवस्था : वर्गखोली तसेच स्टाफ रूम मधील बैठक व्यवस्था शारीरिक अंतरच्या नियमानुसार असावी. वर्गामध्ये एका बाकावर एक विद्याथी याप्रमाणे बैठक व्यवस्था असावी.

शारीरिक अंतरच्या नियमांच्या अंमलबजावणीकरिता विविध चिन्हे व खुणा प्रदर्शित करणे. शाळेत दर्शनी भागावर मास्कचा वापर इत्यादी संदर्भात मार्गदर्शक सूचना प्रदर्शित करावे. थूकण्यावरील बंदीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. अंतर्गत व बाह्य परिसरामध्ये रांगेत उभे राहण्याकरिता किमान सहा फूट इतके शारीरिक अंतर राखले जाईल याकरिता विशिष्ट चिन्हांचा वापर करावा.


**ग्रामपंचायत परसटोला**
**पंचायत समिती,अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद,गोंदिया**
**निविदा सुचना**

निविदा क्र.१ जा.क्र.,ग्रा.पं.परसटोला/२०२१ दिनांक ०५/०७/२०२१

ग्रामपंचायत परसटोला पंचायत समिती, अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद, गोंदिया येथे जलजिवन मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अमानत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १००% कुंटुबांना वैयक्तीक नळ जोडणी करणे | ४२३६२/– | ५००/– | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |
| २ | अरकतोंडी येथे अंगणवाडीला पिण्याची पाण्याची व्यवस्था करणे | १३१७९५ /– | ५००/– | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |

१)वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ०७/०७/२०२१ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक १४/०७/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय परसटोला येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.२) सदरच्या कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ०७/०७/२०२१ ते १४/०७/२०२१ सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय परसटोला येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक १५/०७/२०२१ ला ग्रामपंचायत परसटोला येथे दुपारी १२.०० वाजे उघडण्यात येतील. ४) सदर कामांची तपशीलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**श्री.टी.आर.जनबंधू**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत परसटोला**

**रामू रतिराम कुंभरे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत परसटोला**